सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. १४ जून २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ६१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सोने-चांदी महागले

मुंबई : सराफा बाजारात काही दिवसांच्या घसरणीनंतर सोने आणि चांदीच्या किमतींनी पुन्हा उसळी घेतली आहे. सलग दुसऱ्या दिवशी सोन्या-चांदीच्या दरात वाढ नोंदवण्यात आली असून, जागतिक बाजारातील चढ-उतार आणि वाढलेल्या गुंतवणूक मागणीचा परिणाम देशांतर्गत बाजारावरही दिसून येत आहे. आज २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति तोळा १,४९,०८० वर पोहोचला आहे. शुक्रवारीच्या तुलनेत यात ५०० ची वाढ झाली आहे. तर २२ कॅरेट सोन्याचा दर १,३६,६५० प्रति तोळा झाला असून त्यात ४५० ची वाढ नोंदवली गेली आहे.

## फसवणारा गजाआड

पुणे : एमबीबीएस प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवत देशभरातील विद्यार्थ्यांची आणि पालकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या तेलंगणातील एका महाठगाला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. आदित्यकुमार उर्फ अरविंद प्रकाशकुमार आरोगोंडा (वय ४७) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याविरोधात यापूर्वी मुंबई आणि हैदराबाद येथे फसवणुकीचे सहा गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील एका पालकाची ८.२५ लाख रुपयांची फसवणूक झाल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले.

## विवाहितेची आत्महत्या

छत्रपती संभाजीनगर : नवीन घर बांधण्यासाठी माहेरून १२ लाख रुपये आणण्याचा तगादा आणि दीड वर्षाच्या पोटच्या चिमुरड्याला सासरच्या लोकांनी बळजबरीने हिरावून नेल्याने आलेल्या मानसिक तणावातून एका २४ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली आहे. कन्नड तालुक्यातील हतनूर येथे ही हृदयद्रावक घटना घडली.याप्रकरणी पीडितेच्या वडिलांच्या फिर्यादीवरून कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात पतीसह सासरच्या तिघांविरुद्ध हुंडाबळी आणि छळाचा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तरुणीवर प्राणघातक हल्ला

पालघर : एका तरुणीवर कोयत्याने वार करत जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना पालघर शहरातील पालघर शहरातील गोल्ड सिनेमा परिसरात घडली आहे. स्नेहल सावंत( वय २७) असे या घटनेतील जखमी महिलेचे नाव असून या जीवघेणा हल्ल्यात तरुणी गंभीर जखमी झाली. अमोल मुळे असे हल्ला करणाऱ्या आरोपी तरुणाचे नाव असून जीवघेणा हल्ला करून आरोपी घटनास्थळावरून फरार झाला.

# एलन मस्क बनले जगातील पहिले ट्रिलिनेअर !

वृत्तसंस्था

वॉशिंग्टन : एलन यांच्या स्पेसएक्स कंपनीने शुक्रवार, १२ जून रोजी, अमेरिकन शेअर बाजारातील नॅसडॅकवर दिमाखात लिस्टिंग केली. यासह मस्क आता जागतिक पहिले-वहिले ट्रिलिनेअर बनले आहेत. ब्लूमबर्ग बिलिनेअर निर्देशांकानुसार, मस्क यांची संपत्ती अंदाजे १.११ ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचली असून आता मस्क यांनी इतकी माया जमवली आहे की जगातील सर्वात मोठे भारतीय क्रिकेट मंडळ (इउउख), नेटफ्लिक्स आणि बुर्ज खलिफा सगळं एकाच वेळी खरेदी करू शकतात.



स्पेसएक्सच्या यशस्वी लिस्टिंगसोबतच आता मस्क यांची एकूण संपत्ती एक ट्रिलियन किंवा ९५ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाली आहे. एका सर्वसामान्य व्यक्तीला इतक्या प्रचंड संपत्तीची कल्पना करणेही अवघड आहे. एक ट्रिलियन म्हणजे मस्क यांनी दररोज १० लाख डॉलर्स खर्च केले, तरी त्यांची अख्खी संपत्ती संपायला २७४० वर्षे लागतील. म्हणजे प्रत्येक सेकंदाला १ डॉलर मोजला, तर एक ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचायला ३१,७०० वर्षे लागतील.

मस्क यांच्याकडे जितकी संपत्ती आहे तेवढं भारतीय बाजारात सूचिबद्ध आघाडीच्या १० कंपन्यांचे मूल्यांकनही नाही आहे. रिलायन्स, एचडीएफसी बँक आणि टीसीएस यासारखे दिग्गज भारतातील टॉप-१० कंपन्यांपैकी आहेत. अशाप्रकारे, मस्कची एकूण नेटवर्थ १.११ ट्रिलियन डॉलर्स म्हणजे १०५.६४ लाख कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे तर, इडए नुसार भारतातील ीं-१० कंपन्यांचे बाजार भांडवल केवळ ८८.३५ लाख कोटी रुपये आहे.

एवढेच नाही तर मस्क यांची संपत्ती जागतिक १७२ देशांच्या ऋउझ पेक्षा जास्त होते. सिंगापूर, न्यूझीलंड, इस्रायल आणि कतार यांसारख्या श्रीमंत आणि विकसित देशांच्या अर्थव्यवस्थांपेक्षा जास्त पैसा मस्क यांनी जमवला आहे. त्याचवेळी, ऋउझ च्या बाबतीत मस्कची संपत्ती स्वित्झर्लंड (अंदाजे १.१५ ट्रिलियन डॉलर्स), पोलंड (अंदाजे १.१३ ट्रिलियन डॉलर्स), तैवान (०.९८ ट्रिलियन डॉलर्स), आयर्लंड (०.७८ ट्रिलियन डॉलर्स), इस्रायल (०.७२ ट्रिलियन डॉलर्स), अर्जेंटिना (०.६९ ट्रिलियन डॉलर्स) आणि युएई (०.६२ ट्रिलियन डॉलर्स) पेक्षा जास्त आहे.

स्पेसएक्स आयपीओच्या यशस्वी लिस्टिंगनंतर मस्क जगातील ८ अब्ज लोकांपैकी प्रत्येकाला अंदाजे ८००० रुपये देऊ शकतील. यासाठी मस्क यांना केवळ ८०० अब्ज डॉलर्स खर्च करावे लागतील आणि त्यानंतरही त्यांच्याकडे ३०० अब्ज डॉलर्स शिल्लक राहतील, ज्यामुळे जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तीचा मान त्यांच्याकडेच राहीलं.

# हवाई दलाच्या विमानाचा अपघात



वृत्तसंस्था

दिसपूर : आसाममधील जोरहाट येथील भारतीय हवाई दलाच्या एअरफोर्स स्टेशनवर शनिवारी सकाळी झालेल्या मालवाहू विमानाच्या भीषण अपघातात पायलटसह पाच जवान शहीद झाल्याची दुर्दैवी माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेत विमानाचा सहवैमानिक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर लष्करी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अरुणाचल प्रदेशातील नियोजित मोहिम पूर्ण करून हे विमान नियमित उड्डाणानंतर जोरहाट एअरबेसवर परतत होते. मात्र, लँडिंगदरम्यान विमानाला अपघात झाला आणि काही क्षणांतच संपूर्ण परिसरात खळबळ उडाली.

प्राथमिक माहितीनुसार, विमान धावपट्टीवर उतरण्याच्या तयारीत असताना तांत्रिक अडचण निर्माण झाली. त्यामुळे विमान मुख्य रनवेवर उतरू शकले नाही आणि एअरबेसमधील गवताळ भागात कोसळले. जोरदार धडकेनंतर विमानाचा स्फोट झाला आणि त्याला भीषण आग लागली. अपघाताची तीव्रता इतकी होती की विमानाचे अनेक तुकडे झाले. आग लागल्याची माहिती मिळताच एअरफोर्सचे आपत्कालीन पथक, अग्निशमन दल आणि बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. मात्र, आगीच्या विळख्यात अडकलेल्या पाच जवानांना वाचवण्यात यश आले नाही. या भीषण दुर्घटनेतून सहवैमानिकाला गंभीर अवस्थेत बाहेर काढण्यात आले. त्याला तातडीने लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. तांत्रिक बिघाड, हवामानातील बदल किंवा इतर कोणते कारण यामागे आहे, याचा शोध घेण्यासाठी भारतीय हवाई दलाने उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी 'कोर्ट ऑफ इन्क्वायरी' स्थापन करण्यात आले असून तज्ज्ञांची टीम घटनास्थळी दाखल झाली आहे. विमानाच्या ब्लॅक बॉक्ससह इतर तांत्रिक पुराव्यांची तपासणी केली जाणार आहे.

# पाकिस्तानला पाण्याचा एक थेंबही मिळणार नाही: राजनाथसिंह

वृत्तसंस्था

हैदराबाद : भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सीमापार दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्या पाकिस्तानला अत्यंत कठोर शब्दांत स्पष्ट संदेश दिला आहे. तेलंगणा राज्यातील हैदराबाद येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी सांगितले की, मानवतेच्या आणि शांततेच्या विरोधात उभ्या असलेल्या शक्तींना सिंधू नदीचे पाणी कोणत्याही परिस्थितीत मिळू दिले जाणार नाही. रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही, ही भारताची ठाम भूमिका त्यांनी पुन्हा अधोरेखित केली.

पहलगाममधील भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू जल करार तात्पुरता स्थगित करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला असून, त्याच पार्श्र्वभूमीवर संरक्षणमंत्र्यांचे हे वक्तव्य अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. राजनाथ सिंह यांनी भारतीय लष्कराच्या 'ऑपरेशन सिंदूर'चा उल्लेख करत सैन्याच्या शौर्याचे आणि निर्णायक कारवाईचे कौतुक केले. शांततेची भाषा न समजणाऱ्या शक्तींना त्यांच्या भाषेत उत्तर देणे भारताला चांगलेच माहीत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. भारताच्या सुरक्षा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी खेळ करणाऱ्यांना कोणतीही माफी दिली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. भविष्यात पुन्हा अशा प्रकारचे हल्ले झाल्यास शत्रू देशाला आवश्यक वस्तूंचा पुरवठा-अन्न आणि पाणी यासह-पूर्णपणे रोखण्याची क्षमता भारताकडे असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

राजनाथ सिंह यांनी भारताच्या जागतिक प्रतिमेवरही प्रकाश टाकला. कोरोना महामारीच्या काळात भारताने जगभरात लस आणि औषधांचा पुरवठा करून मानवतेची सेवा केली, याचा त्यांनी उल्लेख केला. त्याच वेळी त्यांनी स्पष्ट केले की, जसा भारत जगासाठी विश्र्वासू भागीदार म्हणून उभा आहे, तसाच देश आपली सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे. भारताकडे जीवन वाचवणाऱ्या लसींसोबतच शत्रूला प्रत्युत्तर देण्यासाठी अत्याधुनिक ब्रह्मोस क्षेपणास्त्र प्रणालीही सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले.

# काँग्रेसमध्ये विलीनीकरणाचा कोणताही प्रस्ताव नाही

तभा वृत्तसेवा

मुंबई : शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे (शरदचंद्र पवार) काँग्रेसमध्ये विलीनीकरण होणार असल्याच्या चर्चांनी सध्या चांगलाच जोर धरला आहे. काँग्रेसकडून शरद पवारांच्या पक्षाला तसा रीतसर प्रस्तावही आल्याचा दावा खुद्द नाना पटोले यांनी केला आहे. मात्र, या सर्व चर्चांना खासदार सुप्रिया सुळे यांनी पूर्णविराम दिला आहे. आमच्या पक्षाचा काँग्रेसमध्ये विलीनीकरणाचा कोणताही प्रस्ताव नाही. शरद पवार यांच्याकडे असा कोणताही प्रस्ताव आलेला नाही आणि पवारांनीही कोणाला असा प्रस्ताव दिलेला नाही, असे त्यांनी शनिवारी स्पष्ट केले.



मुंबईत माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना त्यांनी विलीनीकरणाच्या चर्चेवर सडेतोड भाष्य करत पक्षाची अधिकृत भूमिका मांडली. सुप्रिया सुळे म्हणाल्या, आमचा कोणताही आमदार, खासदार किंवा अन्य कोणत्याही नेत्याशी कोणाचाही संपर्क झालेला नाही. आम्हीदेखील या विषयावर कोणाशीही बोललेलो नाही. त्यामुळे विलीनीकरणाची ही चर्चा नेमकी कुठून सुरू झाली आणि ती कोणी सुरू केली, याबद्दल मला कोणतीही कल्पना नाही.

तृणमूल काँग्रेसविषयी विचारले असता त्या म्हणाल्या, तृणमूल काँग्रेसच्या विलीनीकरणाविषयी नेमके काय सुरू आहे, याची मला माहिती नाही. तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांची बैठक काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांच्यासोबत झाली. या बैठकीत त्या दोघीच होत्या. त्यामुळे त्या दोघींमध्ये काय चर्चा झाली आणि त्यांनी माध्यमांना विलीनीकरणाविषयी काही सांगितले आहे की नाही, याची मला माहिती नाही. तसेच याबाबत माझ्या वाचनातही काही आलेले नाही.




# सुपर एल निनोची ६३ टक्के शक्यता; डिसेंबरपर्यंत तीव्रता आणखी वाढण्याचा अंदाज

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय झाल्याचा अंदाज आता बऱ्याच आंतरराष्ट्रीय हवामान संस्थांनी दिला आहे. पण अमेरीकेतील संस्थांच्या इशाऱ्याने सर्वांच टेन्शन वाढलं आहे. यंदा एल निनोचं रुपांतर सुपर स्ट्रॉन्ग एल निनोमध्ये होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे. हा इतिहासातील सर्वात तीव्र एल निनो असल्याचा अंदाज त्यांनी वर्तवला आहे. याचा परिणाम जगभर होणार असतानाच भारतातील मान्सूनवर यापूर्वीच परिणाम दिसू लागला आहे असं वाटू लागलय. अमेरिकेच्या 'नॅशनल ओशन अँड ॲटमॉस्फेरिक ॲडमिनिस्ट्रेशन' च्या अंतर्गत असलेल्या काहीहवामान खात्यांनी याबद्दल त्यांचा अंदाज जारी केला. यानुसार, आता एल निनो सक्रिय होण्यास सुरूवात झाली असून, नोव्हेंबर ते जानेवारी महिन्यापर्यंत एल निनो अधिक मजबूत होण्याची ६३ टक्के शक्यता आहे. १९५०च्या एल निनोनंतर हा यंदा सर्वात तीव्र एल निनो ठरू शकतो. या घटनेला 'सुपर एल निनो' असं म्हणतात. अमेरीकेतील हवामान संघटनांच्या मे महिन्यातील अंदाजानुसार सुपर एल निनोची स्थिती निर्माण होण्याची ३७ टक्के शक्यता असल्याचा अंदाज वर्तवला होता. दरम्यान, युरोपमधील हवामान विभागांनीही 'सुपर एल निनो' नोव्हेंबर ते डिसेंबरपर्यंत निर्माण होईल असा अंदाज वर्तवला आहे.

भारतीय हवामान विभागानेही एल निनो सक्रिय झाल्याची घोषणा केली आहे. यामुळेमोसमी पावसावरमोठा परिणाम होणार असून मान्सूनच्या पुढील महिन्यात ही परिस्थिती आणखी तीव्र होण्याचा अंदाज आहे. प्रशांत महासागरातील पाण्याच्या पुष्टभागावरील तापमान वाढलं असून वातावरणातही एल निनोची स्पष्ट चिन्ह दिसू लागली आहेत. तसेच, महासागराच्या पुष्टभागाखालीही पाण्याचं तापमान वाढू लागलं आहे. मे महिन्यात पहिल्यांदा विषुवृत्तीय प्रशांत महासागराच्या मध्य आणि पूर्व भागांतील तापमान नेहमीपेक्षा अधिक नोंदलं गेलं होतं. त्यावेळी एल निनो निर्माण होण्याची चिंता व्यक्त केली गेली. दरम्यान, हिंद महासागरातही तापमान चढेच होतं. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात एप्रिल-मेदरम्यान सरासरीच्या तुलनेत अधित तापमान होतं. त्यानंतर हे तापमान वाढत गेलं. जून महिन्यात प्रशांत महासागरातील तापमान अजून वाढलं असून एल निनोसाठी पोषक वातावरण निर्माण झालं. हिंद महासागरातील द्विध्रुवामुळेभारताला दिलासामिळेल अशी शक्यता होती. २०२६च्या जानेवारी महिन्यात स्थिर झाल्यानंतर आता द्विध्रुव तटस्थ राहिला. संपूर्ण मान्सून च्या काळातही हा तटस्थच राहणार असल्यामुळे एल निनोचा प्रभाव भारतावर कायम राहणार आहे. भारताच्या पुढील वर्षातील उन्हाळ्यावरही या परिस्थितीचा परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच, मान्सून महिन्यातही उन्हाळ्यासारखी उष्णता कायम राहण्याची शक्यता आहे.



## संक्षिप्त...

### जनतेच्या सुरक्षिततेसाठी स्वतःच्या सुख-दुःखाचा विचार न करणारा खरा योद्धा म्हणजे पोलीस : राहुल केंद्रे

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १३ जून : जनतेच्या सुरक्षिततेसाठी स्वतःच्या सुख-दुःखाचा विचार न करता रात्रंदिवस कर्तव्य बजावणारा खरा योद्धा म्हणजे पोलीस होय. समाजात शांतता, सुव्यवस्था आणि कायद्याचे राज्य अबाधित राखण्यासाठी पोलीस दलाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे, असे प्रतिपादन राहुल केंद्रे यांनी केले.

उदगीर तालुक्यातील हेर येथील सुपुत्र तथा सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) धनाजीराव गायकवाड यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त कृष्णाई मंगल कार्यालयात आयोजित सत्कार सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी प्रा. विठ्ठलराव धाकणे, पंडितराव पाटील, सरपंच पंडित धागे, सरपंच संग्राम भालेराव यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राहुल केंद्रे म्हणाले की, पोलीस अधिकारी व कर्मचारी अनेकदा आपल्या कुटुंबापासून दूर राहून नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेच्या सुरक्षेसाठी कार्यरत असतात. सण-उत्सव, कौटुंबिक आनंदाचे क्षण आणि वैयक्तिक सुख-दुःख बाजूला ठेवून ते समाजसेवेचे व्रत जपत असतात. त्यामुळे खाकी वर्दी ही केवळ गणवेश नसून विश्र्वास, धैर्य, शिस्त आणि कर्तव्यनिष्ठेचे प्रतीक आहे.

यावेळी त्यांनी धनाजीराव गायकवाड यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी संपूर्ण सेवाकाळात प्रामाणिकपणा, निर्भीडपणा आणि जनसेवेची मूल्ये जपली. कोणत्याही दबावाला बळी न पडता त्यांनी कर्तव्याला सर्वोच्च प्राधान्य देत सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या कार्यामुळे पोलीस खात्याची प्रतिमा अधिक उंचावली आहे.कार्यक्रमात धनाजीराव गायकवाड यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

### लातूर-जहिराबाद महामार्गावर तरुणाला टँकरने चिरडले

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १३ जून : मसलगा पाटीवर अज्ञात तरुणाचा पंपाजवळ महामार्गाच्या जागीच मृत्यू वाहनाच्या धडकेत एका शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याच्या घटनेला २४ तास उलटण्यापूर्वीच लातूर-जहिराबाद राष्ट्रीय महामार्गावर निटूर येथील एचपी पेट्रोल कडेला म्हैस चारत असलेल्या युवकाला भरधाव टँकरने चिरडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी (दि १२) रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास घडली. या अपघातात सुधाकर ज्ञानोबा चव्हाण (वय २८) यांचा मृत्यू झाला.

निलंगा तालुक्यातील निटूर येथील सुधाकर चव्हाण हे महामार्गालगत म्हैस चारत असताना लातूरच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव टँकरने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघातानंतर संबंधित टँकरसह चालकाला निटूर पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, मृतदेह शवविच्छेदनासाठी निटूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आला आहे. या दुर्घटनेमुळे चव्हाण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

### नागरी सहकारी बँकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील राहू : कव्हेकर

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जून : जिल्ह्यातील नागरी बँक असोसिएशनच्या माध्यमातून बँकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी लातूर जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनची स्थापना करण्यात आली. या असोसिएशनची बैठक पार पडली यामध्ये लातूर जिल्ह्यातील नागरी बँकांचे अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्यामध्ये प्राध्यान्याने १०१ ची कार्यवाही झाल्यानंतर जिल्हाधिकार्यांकडे ताब्यासाठी जाण्याची गरज नव्हती. परंतु केंद्र शासनाने त्यामध्ये बदल केला. ज्यामुळे बँकांना वसूलीसाठी अडचणी येत आहेत. यासाठी डी.डी.आर यांनी निर्णय दिल्यानंतर कार्यवाही करता यावी. याबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याचाही निर्णय या बैठकीत घेण्यात आला. याबरोबरच नागरी बँकांचा व्याजदर, सभासद नोंदणी, बँक असोसिएशन ऑडीट व इतर प्रश्न मांडण्यात आले. त्यामुळे या असोसिएशनच्या माध्यमातून नागरी बँकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू असे प्रतिपादन लातूर जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

# अधिक मासात सासऱ्याने दिले जावयास नवजीवन

तभा वृत्तसेवा/ प्रमोद सुरवसे



लातूर दि. १३ जून : मराठी महिन्यांत साधारणपणे दर तीन वर्षांनी येणारा अधिक मास म्हणजेच धोंड्याचा महिना अधिक महिन्यात लेक आणि जावयास घरा बोलावून पुरणपोळी आणि धोंडा, आमरसाचे भोजन देण्याची प्रथा असून भोजनानंतर लेक_ जावयास कपडे, संसारोपयोगी साहित्य तसेच बोट पिवळे करण्यासाठी सोन्याची आंगठी देण्याची जुनी परंपरा आहे .

यावेळी लेक जावयाला३३ वस्तुंचे वाण देण्याची धार्मिक श्रद्धा असून यात तांब्याचे ताट, वितळेची आरती,३३ दिवे आणि अनारसे दिले जातात. या मासास पुरुषोत्तम मास असेही म्हणतात . तसेच या महिन्यात भगवान श्रीकृष्णाची भक्ती केल्यास फलप्राप्ती होत असते अशी आख्यायिका आहे

हे जरी अधिक मासास होत असले तरी आर्थिक गणितं जुळवताना शेतकरी वर्ग मेराकुटीस आला असून गतवर्षी पावसाने सोयाबीन वाहून गेले . रब्बीच्या पिकास अपेक्षित दर मिळाला नाही . आणि आता खरीप तोंडावर असल्यामुळे पेरणी, खतांच्या वाढत्या दरांमुळे संकट समोर आहे शिवाय आर्थिक परिस्थिती बेताची असत्यामुळे इच्छा असूनही काहीही करता येत नाही . किंवा तसे नियोजन होत नाही.

यावर्षी औसा तालुक्यात एका सासऱ्यानी जावयाला अधिक मासास वरील वस्तू किंवा कपडे, सोन्याची अंगठी किंवा इतर वस्तू दिल्या नाहीत तर जावयाला अनमोल असे जीवनदान दिले आहे . औसा तालुक्यातील आलमला येथील दयानंद कोरके यांच्या दोन्ही किडण्या निकामी झाल्या असल्याचे त्यांचे सासरे भाऊसाहेब मुदगुणे यांना समजताच त्यांनी धावाधाव सुरु केली, आपल्या मुलीच्या डोळ्यातील वेदना आणि जावयाच्या आयुष्यातील होत असलेली झुंज पाहून कोणताही स्वार्थ, कोणतीही भीती तसेच कोणताही विचार न करता, स्वतःची एक किडणी जावयाला देण्याचा निर्णय घेतला . .पुढची कारवाई हॉस्पिटल प्रशासनाने पार पाडली .

आजच्या स्वार्थी तसेच धावपळीच्या जगात अशा प्रकारची उदाहरणे दुर्मिळच म्हणावी लागतील . नाती केवळ औपचारिक राहात असतात पण मुलीच्या सुखासाठी एक वडील किती मोठा त्याग करू शकतो, हे एका शेतकरी बापाने दाखवून तर दिलेच शिवाय समाजात एक आदर्श निर्माण केला .

आपल्या प्रेमाचा, मायेचा आणि समर्पणाचा सर्वोच्च पुरावा देऊन त्यांचा हा त्याग समाजासाठी प्रेरणादायी आहे असे उदाहरण मागे कधी घडले असेल ना भविष्यात कधी घडेल असे वाटत नाही कारण एकमेकाशी नाते कसेही, कोणतेही असू द्या, जेव्हा त्यांच्यात जेव्हा काही तरी देण्याची वेळ येते अस्तित्वातील नाती संपुष्टात येत असल्याची उदाहरणे आजपर्यंत आपण कितीतरी बघितली आहेत .

# दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जून : पोलीस प्रशासन :हेल्मेट , सीट बेल्ट चा वापर, वेगावर नियंत्रण, वाहतूक नियमांचे पालन चाबाबत नेहमीच सूचना देत असतात

पण निष्काळजीपणामुळे अनेकांचे आयुष्य उद्धवस्त होत असल्याच्या घटना घडत आहेत . किनगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत जढळा गावाजवळ एक अपघात घडला . यात२० वर्षीय तरुण चालकासह अवध्या१७ महिन्याच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला तर एका कुटुंबातील सदस्य जखमी झाला .

या घटनेने दोन कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे .

हाटक्याळ ता . कंधार जि नांदेड . येथील विशाल मिरकले आपल्या पत्नी आणि लहान मुलांसह इरटिगा एम एच१५ जे एक्स१५२८ मधून बेलगाव कडे जात होते . पहाटेच्या वेळी प्रवास सुरु असताना जढळा गावाजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या मधोमध असलेल्या डिव्हायडरवर वेगाने आढळली . याने वाहनाचे मोठे नुकसान झाले . चालक महादेव नरहारे याचा मृत्यू झाला तर मिरकले यांच्या१७ वर्षाच्या मुलाचा ही मृत्यू झाला असून मिरकले आणि त्यांची पत्नी गंभीर जखमी झाले .

कोणतेही वाहन चालविताना काळजी घेणे आवश्यक असते . चालकांच्या एका चुकी मुळे अनेकांचे संसार देशोधडीला लागत असतात . चुक नसतानाही आपले लाख मोलाचे जीव गमवावे लागतात. त्यामुळे चालकांना नम्र विनंती की, गाडी चालविताना निस्काळजीपणे गाडी चालवू नका, आरटीओ च्या सूचनांचे तंतोतंत पालन करून आपला तसेच आपल्या गाडीत बसणाऱ्यांचा जीव हा लाख मोलाचा असतो.

## महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १३ जून : शहरातील शिवाजी सोसायटी भागात राहणाऱ्या एका ३२ वर्षीय महिलेने घरातील पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी (दि. १२) सकाळी उघडकीस आली आहे.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, मयत महिला श्रीदेवी पि. बालाजी गव्हाणे (वय ३२ वर्षे, रा. शिवाजी सोसायटी उदगीर) हिने शुक्रवारी (दि. १२) ९:३० वाजताच्या पूर्वी तिच्या राहत्या घरातील पंख्याला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे, अशी माहिती मयत महिलेचा भाऊ विजय बालाजी गव्हाणे (रा. कोनाळी डोंगर ता. जळकोट) यांनी पोलिसात दिली आहे. त्यावरून उदगीर शहर पोलिसात अकस्मात मृत्यू क्रमांक १४ /२६ कलम १९४ बीएनएसएस प्रमाणे नोंद घेण्यात आली आहे.

## नेत्रदान जनजागृती व नेत्रतपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जून : येथील सौ. सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, लातूर येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने नेत्रदान जनजागृती व मोफत नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. पल्लवी घोगळे यांनी उपस्थितांना नेत्रदानाचे महत्त्व, त्याबाबतचे गैरसमज तसेच नियमित नेत्रतपासणीची आवश्यकता याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. नेत्रदानामुळे अंध व्यक्तींना दृष्टीदान मिळू शकते आणि समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडण्याची संधी मिळते, असे त्यांनी सांगितले. त्यांनी डोळ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी नियमित नेत्रतपासणीचे महत्त्वही अधोरेखित केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला.

या कार्यक्रमास सौ. सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. आशा मुंडे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक डॉ. गुरुनाथ देशमुख, प्रा. दादासाहेब लोंढे, प्रा. बापू गायकवाड, प्रा. सी. एस. पवार, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## इयत्ता ३ री च्या पाठ्यपुस्तकात रसूल पठाण यांची कविता




तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १३ जून : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे मार्फत तयार करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रमात इयत्ता ३ री च्या पाठ्यपुस्तकात (इंग्रजी माध्यम) साठी रसूल पठाण यांची नदी माय ही कविता समाविष्ट करण्यात आली आहे.

रसूल पठाण यांच्या निसर्गाशी जुळवू नाते.. या बालकविता संग्रहातील नदी माय ही कविता इयत्ता ३ री मध्ये इंग्रजी माध्यमातून शिकण घेणारे लाखो विद्यार्थी अभ्यासणार आहेत. रसूल पठाण हे एकुर्का रोड येथील समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सेवेत कार्यरत असून त्यांचे महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान राहिले आहे. निसर्गाचे चित्रण व सौंदर्य साध्या सोप्या शब्दात मांडणारे ग्रामीण भागातील बालकवी म्हणून प्रसिद्ध असलेले रसूल पठाण यांची कविता पाठ्युस्तकात समाविष्ट झाल्याबद्दल माजी मंत्री आ. संजय बनसोडे, म. ए. सोसायटी चे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, मसाप केंद्रीय कार्यकारिणी उपाध्यक्ष तथा लातूर जि. प. तील भाजपा गटनेते रामचंद्र तिरूके, लातूर जि. प. चे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, समर्थचे प्राचार्य प्रमोद चौधरी, साहित्यिक, पत्रकार संजय ऐलवाड, अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संस्था उदगीर शाखा अध्यक्ष प्रा. रामदास केदार, मसाप उदगीर शाखा अध्यक्ष धनंजय गुडसूरकर, सहकार्यवाह अनिता यलमटे, समर्थचे पर्यवेक्षक सिध्दार्थ बोडके, सहसचिव प्रणयन चौधरी, संस्था सदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, प्रयास चौधरी, प्रा. बी. एस. बाबळसुरे, डॉ. हर्षवर्धन जाधव पाटील, जय हिंदच्या प्राचार्या ज्योती स्वामी, प्रा. बिभीषण मद्देवाड, सिद्धार्थ सुर्यवंशी, , नीता मोरे, आदींनी अभिनंदन केले आहे

# डॉ. मनीषाताई होळकुंदे यांना राज्यस्तरीय आदर्श समाज रत्न पुरस्कार प्रदान



तभा वृत्तसेवा

कासार शिरसी दि.१३ जून : निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा आधार वृद्धाश्रमाच्या संचालिका व एकता बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. मनीषाताई होळकुंदे यांना राष्ट्रभक्ती सन्मान सोहळा २०२६ च्या वतीने सदाशिव पेठ ,पुणे येथे आयोजित गौरव सोहळ्यात विविध क्षेत्रातील कर्तुत्ववान व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यात सामाजिक क्षेत्रातील राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार डॉ. मनिषाताई होळकुंदे यांना प्रदान करण्यात आले. मनिषाताई होळकुंदे या गेल्या अनेक वर्षांपासून निराधार वृद्ध आजी आजोबांना आधार देऊन त्यांचे अश्रू पुसण्याचे कार्य करत आहेत. गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी, महिला सक्षमीकरणासाठी , तृतीयपंथियासाठी व गोवर्धन गोशाळेच्या माध्यमातून गोवंशाच्या सेवेसाठी ते परिश्रम घेत आहेत. विविध माध्यमाद्वारे मदतीचा हात देऊन सर्वांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी ते सतत झटत असतात. या त्यांच्या अथक प्रयत्नाची व कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत. केवळ राज्यातील व देशातील नव्हे तर त्यांच्या कार्याची दखल घेत आंतरराष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारही त्यांना देण्यात आले आहे.

नुकतेच नाशिक येथे आनंदी फाउंडेशन च्या वतीने महाराष्ट्र भूषण पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला असून आता या *राज्यस्तरीय आदर्श समाज रत्न* पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. सदरील पुरस्कार विविध क्षेत्रातील विशेष मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी राष्ट्रभक्ती परिवाराचे अध्यक्ष सुनील गोरे, डॉ. शंकर अंदानी, रतिलाल चौधरी, भारती तुपे, गोपालजी खंडारे, अमान बागवान, प्रवीण भंडारी, डॉ. स्वप्निल माने, राजेंद्र पवार, डॉ. भावना मंगेश, संदीप रासकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या सत्कार सोहळ्याला उत्तर देताना डॉ. मनीषाताई म्हणाल्या की, अलीकडील काळात समाजामध्ये आपल्याच परिवारातील वृद्ध व्यक्तींना दुर्लक्षित केले जात आहे व त्यामुळे त्यांचे आयुष्य दुःखदायक होत आहे मात्र अशा दुखी वृद्ध आई-वडिलांची सेवा करण्यास मी प्रयत्नशील आहे व मिळणाऱ्या या पुरस्काराने मला हे कार्य करण्यात अधिक बळ मिळत आहे असे त्या म्हणाल्या व राष्ट्रभक्ती परिवाराने दिलेल्या सन्मानाबद्दल आभार व्यक्त केले.

## उदगीर तालुक्यातील मजूराचा लांजी शिवारात खून



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १३ जून : तालुक्यातील मौजे लांजी शिवारात हात बांधून, गळा आवळून करण्यात आलेल्या खून प्रकरणातील मृतदेहाची ओळख पटली आहे. मयत इसमाचे नाव गोविंद सदाशिव फताटे (वय ५० रा. नावंदी, ता. उदगीर) असल्याचे निष्पन्न झाले आहे. मृतदेह आढळून येताच घातपात असल्याचा संशय व्यक्त केला जात होता. अखेर हात-पाय बांधून गमजाने गळा आवळून खून केल्याचे समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मयत गोविंद फताटे हे बांधकामावर मजुरी करायचे. या धक्कादायक हत्याकांडामुळे अहमदपूर, उदगीर परिसरात तीव्र खळबळ उडाली असून, आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी जिल्हा पोलीस दलाची यंत्रणा कामाला लागली आहे. शुक्रवारी (दि.१२) सकाळी लांजी येथील शेतकरी प्रताप दादाराव मुंडे यांच्या शेतात हा मृतदेह आढळून आला होता. मयताचे हात टॉवेलने बांधलेले होते आणि गळ्याला पांढऱ्या रंगाचा गमजा आवळून खून केल्याचे स्पष्ट झाले होते. पोलीस पाटील राजकुमार मुकुंदराव दराडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अहमदपूर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. तर अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी अहमदपूर पोलीस स्टेशन येथे तळ ठोकून तपासाची सर्व सूत्रे हाती घेतली आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे, पोलीस उपअधीक्षक अक्षय जाधव, पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार आणि स्थानिक गुन्हे शाखेच प्रमुख सुधाकर बावकर हे तपासाची चक्रे वेगाने फिरवत आहेत. तसेच तांत्रिक पुराव्यांसाठी फॉरेन्सिक टीम, डॉग स्कॉड आणि फिंगर प्रिंट एक्सपर्ट्सनी घटनास्थळाची बारकाईने तपासणी केली आहे. ज्या पद्धतीने हा खून झाला आहे, तो पाहता आरोपींपर्यंत पोहोचण्यासाठी पोलीस सर्व ताकद पणाला लावली.

# बोंबळीच्या भूमिहीन शेतकऱ्यास अखेर नवा बैल

### खरोळा येथील जनावरांच्या बाजारातून बैल खरेदी; मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार कार्यवाही



तभा वृत्तसेवा

वलांडी, दि. १२ जून : देवणी तालुक्यातील बोंबळी येथील भूमिहीन शेतकरी काशिनाथ गायकवाड यांना अखेर नवीन बैल उपलब्ध करून देण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार रेणापूर तालुक्यातील खरोळा येथील आठवडी जनावरांच्या बाजारातून बैल खरेदी करून गुरुवारी उशिरापर्यंत गायकवाड यांच्या ताब्यात देण्यात आला.

काशिनाथ गायकवाड यांचा एकमेव बैल वीज पडून दगावल्याने त्यांच्यावर मोठे संकट ओढवले होते. शेतीची कामे ठप्प होण्याची वेळ आल्याने हा विषय राज्यभर चर्चेत आला होता. त्यानंतर प्रशासनामार्फत त्यांना एक बैल उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र, तो बैल शारीरिकदृष्ट्या कमजोर असल्याने शेतीच्या कामासाठी उपयुक्त नसल्याची तक्रार करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ दखल घेत पशुसंवर्धन विभागाला योग्य व सक्षम बैल उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. त्यानुसार पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी खरोळा येथील जनावरांच्या बाजारातून नवीन बैल खरेदी करून गायकवाड यांच्या ताब्यात दिला.

**प्रशासनाची धावपळ**

गायकवाड यांना यापूर्वी देण्यात आलेला बैल शेतीची कामे करताना वारंवार बसत असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या घटनेची गंभीर दखल घेत तहसील कार्यालयापासून मंत्रालयापर्यंतची यंत्रणा सक्रिय झाली. त्यानंतर योग्य बैल खरेदी करण्यासाठी प्रशासनाने तत्काळ हालचाली करत नवीन बैलाची व्यवस्था केली. त्यामुळे गायकवाड कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून आगामी शेतीकामांसाठी मदत झाली आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सिल्लोड तालुक्यातील 105 ग्रामपंचायतीमध्ये राबविण्यात आली सामूहिक स्वच्छता मोहीम



दिनांक १३ जून २०२६ शनिवार रोजी माननीय जिल्हाधिकारी महोदय विनय गौडा जी सी जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद संभाजीनगर मिन्नू पी. एम. यांच्या आदेशानुसार तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार, प्रभारी गट विकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड आशिष मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली सिल्लोड तालुक्यातील १०५ ग्रामपंचायतीमध्ये सामूहिक महा-स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सिल्लोड तालुक्यातील मोठ्या १० ग्रामपंचायती मध्ये संपर्क अधिकारी नेमण्यात आले. तसेच प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये कचरा करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईसह वापर शुल्क वसुलीचा घेतला निर्णय

सिल्लोड तालुक्यातील ग्रामीण भागातील वाढते प्लास्टिक प्रदूषण आणि अस्वच्छतेच्या समस्येला आळा घालण्यासाठी जिल्हा व तालुका प्रशासनाने कंबर कसली आहे. शनिवार, १३ जून रोजी सिल्लोड तालुक्यातील सर्व १०५ ग्रामपंचायतींमध्ये महा-स्वच्छता मोहीम राबवण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेण्यात आला आहे. या मोहिमेत तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींचा सहभाग घेतला असून, विशेषतः सार्वजनिक ठिकाणचा कचरा आणि प्लास्टिकचे ढिगारे हटवण्यावर प्रशासनाचा मुख्य भर आहे.

ग्रामीण भागातील शाळा, अंगणवाड्या, मंदिरे, नदीपात्रे आणि

ओढ्यांच्या काठावर जमा होणारे प्लास्टिक हे पर्यावरणासाठी घातक ठरत आहे. हेच ओळखून या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे ठरवले आहे. या मोहिमेत सहभागी होण्यासाठी आणि प्रत्यक्ष देखरेख ठेवण्यासाठी जिल्हा परिषद सज्ज झाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उप-मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व गट विकास अधिकारी, सहायक गट विकास अधिकारी आणि पंचायत समितीचे विभागप्रमुख अशा किमान १० उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची फौज शनिवारी विविध ग्रामपंचायतींना भेटी देऊन स्वच्छतेच्या कामात सहभागी आहे.

ऐतिहासिक व धार्मिक स्थळांच्या परिसरात प्लास्टिकच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालण्याचे निर्देश ग्रामपंचायतींना देण्यात आले आहेत. परिसर कायम स्वच्छ राहण्यासाठी कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचेही सांगण्यात आले.

कायमस्वरूपी स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी

केवळ एक दिवसाची स्वच्छता मोहीम राबवून प्रशासनाचा हेतू संपणार नाही. या मोहिमेनंतर संबंधित ग्रामपंचायतींना ही गावे कायमस्वरूपी स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कचरा व्यवस्थापनाचा हा मॉडल केवळ सरकारी अनुदानावर अवलंबून न ठेवता, तो ग्रामपंचायतींच्या आर्थिक सक्षमतेशी जोडला जात आहे. ज्याप्रमाणे शहरात कचरा संकलनासाठी शुल्क आकारले जाते, त्याच धर्तीवर ग्रामीण भागातही व्यावसायिक आणि रहिवासी आस्थापनांकडून कचरा व्यवस्थापन शुल्क गोळा करून ही यंत्रणा स्वयंपूर्ण करणे आवश्यक आहे.

मोहिमेत तालुक्यातील सर्व विभागप्रमुख आणि अधिकारी सहभागी होऊन ग्रामीण भागातील अस्वच्छता दूर करतील. केवळ मोहीम राबवून आम्ही थांबणार नाही, तर यापुढे गावे स्वच्छ ठेवण्यासाठी ग्रामपंचायतींनी दंडात्मक कारवाई आणि कचरा व्यवस्थापन शुल्क वसुलीवर भर द्यावा, अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

ग्रामपंचायत केऱ्हाळा तालुका सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर सकाळी जिल्हा परिषद केंद्रीय शाळा केऱ्हाळा येथून महास्वच्छता मोहिमेला सुरुवात करण्यात आली गावातील बस स्थानक मुख्य रस्ता या ठिकाणावरील कचरा व प्लास्टिक कचरा हा सामूहिकरीत्या गोळा करण्यात आला.गाव स्वच्छता व परिसर स्वच्छता करण्यात आली तसेच गावातील दुकान मालकांना कचरा वर्गीकरण करण्याबाबत सूचित करण्यात आले आपला कचरा आपली जबाबदारी आपल्या दुकानातील कचरा रस्त्यावर न टाकता दुकानात मध्ये कचराकुंड्या ठेवून त्यात टाकावा असे निर्देश दिले प्लास्टिक कचऱ्यामुळे होणारे दुष्परिणाम याविषयी ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली कचरा कुटुंब पातळीवर चार प्रकारच्या कुंड्यांमध्ये वर्गीकरण करावे ओला कचरा, सुका कचरा ,मेडिसिन कचरा, घातक कचरा त्यामुळे कचरा व्यवस्थापन करणे सोयीचे होईल तसेच स्वच्छता केल्यानंतर पुन्हा त्या ठिकाणी कचरा होऊ नये याबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी महास्वच्छता मोहिमेचे संपर्कप्रमुख म्हणून प्रभारी गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड आशिष मस्के ,लोकप्रतिनिधी पंचायत समिती सदस्य सुमित्रा सुदाम बनसोड, प्रशासक उषाबाई कृष्णा पांढरे, साहेबराव बांबर्डे, कृष्णा पांढरे,

आजिनाथ भिंगारे,

हकीम पठाण गावातील लोकप्रतिनिधी, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) माहिती शिक्षण संवाद जिल्हा तज्ञ डॉक्टर संजय वाघ, विस्तार अधिकारी (पंचायत) राधाकिसन चौधरी, ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती अर्चना शेळके, मुख्याध्यापक रामचंद्र मोरे, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, महिला स्वयंसहायता गटातील महिला, ग्रामपंचायत कर्मचारी, शिक्षक, शालेय विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## बिडकीन-चितेगाव परिसरातील भेसळयुक्त व्यवसायांवर कारवाईची भीती; अनेक दुकाने बंद

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. १३ जून** : राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त म्हणून तुकाराम मुंडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरातील भेसळयुक्त अन्नपदार्थ व औषधांची विक्री करणाऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. पदभार स्वीकारल्यापासून त्यांनी विविध ठिकाणी भेसळयुक्त पदार्थांवर कारवाईचा धडाका लावल्याने अन्न व औषध प्रशासन विभाग अधिक सक्रिय झाल्याची चर्चा आहे.

आज बिडकीन-चितेगाव परिसरात अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांचे पथक दाखल झाल्याची माहिती पसरताच अनेक व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. यामुळे परिसरातील काही पानटपऱ्या, किराणा दुकाने, मेडिकल स्टोअर्स, ज्यूस सेंटर्स, हॉटेल्स, वडापाव विक्रेते तसेच गुटखा विक्री करणारी अनेक दुकाने दिवसभर बंद ठेवण्यात आल्याचे दिसून आले.

विशेष म्हणजे, अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी नेमके कुठे तपासणी करत आहेत याबाबत कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नसतानाही कारवाईच्या भीतीने अनेक दुकानदारांनी आपला व्यवसाय बंद ठेवला. त्यामुळे परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे. नागरिकांमध्ये अशीही चर्चा सुरू आहे की, संबंधित व्यावसायिकांकडून कोणतीही भेसळयुक्त किंवा नियमबाह्य विक्री होत नसेल, तर त्यांनी आपला व्यवसाय अचानक बंद का ठेवला? या घटनेमुळे अन्नसुरक्षा आणि भेसळविरोधी कारवाईबाबत जनतेत जागरूकता वाढताना दिसत आहे.

**OFFICE OF THE RETURNING OFFICER**
**DOMBIVLI NAGARI SAHAKARI BANK LTD. (MULTI STATE SCHEDULED BANK)**

"Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East)-421 204.

**Programme for the Election of the Board of Directors of Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank)**

In the exercise of the powers conferred by the Section 45 of Multi State Co-operative Societies Act 2002 read with the Rule 19 of the Multi State Scheduled Societies Act 2002 & Election schedule there. District Collector, Thane Districts returning Officer and District Deputy Registrar Co- operative Societies, Thane appointed to conduct the Elections of Board of Directors of Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), having its registered Office at "Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East)-421 204.
Office of the Returning Officer: District Collector Magistrate Thane, opp. Thane District Court Naka, Thane (West) Tal- & Dist.- Thane 400 601.
Office of the Assistant Returning Officer: Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East)-421 204.

**1) Post for which Election being held - Board Members-**

| Sr. No. | Particulars | No of Seats |
|---|---|---|
| 1 | General | 8 |
| 2 | Women | 2 |
| 3 | SC/ST | 1 |
| | **Total** | **11** |

**2) The Election program for seeking name of Representative/ Delegate -**

| Election programme of Delegates | Date |
|---|---|
| Handing over names of Societies by CEO to RO | 15th June, 2026 (Monday) |
| Publication of List of Members (LLP & Partnership Firms) by RO on the website and on the Notice Board of the Bank | 16th June, 2026 (Tuesday) |
| Sending of Letters to LLPS & Partnership Firms requesting to send names of representatives by RO | On or before 19th June, 2026 (Friday) |
| Last Date of receiving of resolution of delegates from Members Societies by RO | 27th June, 2026 (Saturday) |

**3) The Election program for the Board of Directors**

| Sr. No. | Particulars | Date | Time | Place |
|---|---|---|---|---|
| 1 | Publication of Provisional List of Members / Representatives Eligible to Vote (Constituency-wise as per the Bye-Laws of Bank) | 29th June, 2026 (Monday) | By Evening | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East)- 421 204. |
| 2 | Time window for raising Objection to the Provisional List | 30th June, 2026 To 03rd July, 2026 (Tuesday to Friday) | 11.00 a.m. to 03.00 p.m. | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East)-421 204. |
| 3 | Scrutiny of Objection received to the Provisional List (if any) | 06th July, 2026 To 09th July, 2026 (Monday To Thursday) | 11.00 a.m. to 03.00 p.m. | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli(East)-421204. |
| 4 | Publication of Final Voters List of Members eligible to Vote | 09th July, 2026 By Evening (Thursday) | By Evening | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli(East)-421204 |
| 5 | Issue & filing of Nominations | 10th July To 15th July, 2026 (Friday to Wednesday) (Except Sunday) | 11.00 a.m. to 03.00 p.m. | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli(East)-421 204 |
| 6 | Publication of List of Nominations received | 15th July, 2026 (Wednesday) | By Evening | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj",Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli(East)-421 204 and on Banks web-site. |
| 7 | Scrutiny of received Nomination forms | 16th July, 2026 (Thursday) | Till the Scrutiny is complete | Office of the Returning Officer & District Collector, Thane, 1st floor, Collector Office, Court Naka, Thane (West)-400 601. |
| 8 | Publication of List of Valid Nominations | 16th July, 2026 (Thursday) | After Scrutiny | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj",Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East)-421 204 and on Banks web-site. |
| 9 | Withdrawal of Nominations | 17th July, 2026 (Friday) | 11.00 a.m. to 03.00 p.m. | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj",Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road,Sonarpada,Dombivli(East)-421 204 |
| 10 | Publication of Final List of Contesting Candidates | 17th July, 2026 (Friday) | By Evening | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj",Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East)- 421 204. |
| 11 | Date of Polling (if necessary) | 26th July, 2026 (Sunday) | 08.00 a.m. to 04.00 p.m. & All those who have entered polling station at 04.00 p.m. or before will be allowed to cast the vote | Place will be declared later. |
| 12 | Counting of Votes | 29th July, 2026 (Wednesday) | 08.00 a.m. onwards | Place will be declared later. |
| 13 | Submission of Form 19M with recommendation for seeking approval of CEA before declaration of result of BOD. | 30th July, 2026 (Thursday) | --- | --- |
| 14 | Declaration of Result of Board of Directors | 05th August, 2026 (Wednesday) | | |
| 15. | Election program of Office Bearers | | | |
| (1) | Announcement of Election Schedule | 12th August, 2026 (Wednesday) | | --- |
| | i) Time window for filing nominations | 09.30 am to 11.30 am | After declaration of Result of Board Members Election | Office of Returning Officer and District Collector, Thane 1st Floor Collector Office, Court Naka, Thane (W) 400 601. |
| | ii) Scrutiny of nomination papers | 12.30 p.m. to 02.00 p.m. | | |
| | iii) Time and Date for withdrawal | 02.00 p.m. to 04.00 p.m. | | |
| | iv) Display of list of the contesting candidate and schedule of election. | 04.00 p.m. | | |
| (2) | Meeting of Newly constituted Board & Publication of list of Valid Nominations, Polling (if required) | 13th August,2026 (Thursday) | 11.00 a.m. onwards | Office of Returning Officer and District Collector, Thane 1st Floor Collector Office, Court Naka, Thane (W) 400 601. |
| (3) | Declaration of Result of Election of Office Bearers | On or before 20th August, 2026 (Thursday) | --- | --- |

**Notes:**
1. A copy of Voters List will be supplied by the Bank to any Regular Member on payment of fees of Rs. 4,000/- + GST 18% as decided by the Bank.
2. Nomination form may be presented in person by the candidate himself or by any person authorized by him in this behalf as per Election Programme.
3. A regular Member who gets disqualified, under any of the provisions specified in section 43 & 44 of the Multi State Co-operative Societies Act 2002 & or Bye-Laws of the Bank, shall not be eligible for being nominated for a seat on the Board.
4. The candidate filling the Nomination must comply prerequisites as per provisions of Bye- Laws of the Bank.
5. The Candidate filling Nomination Form under the category of reserved seat for Scheduled Caste or Scheduled Tribe, should attach copy of caste certificate duly attested by Gazetted Officer / Notary with his Nomination Form.
6. Withdrawal of Nomination (if any) shall be made by a Notice in writing by candidate himself and submitted in person by the candidate or by person authorized by him in this behalf as per Election Programme. A Notice of withdrawal of Nomination once given shall be irrevocable.

**Place: Dombivli.**
**Date: 14-06-2026.**

**Sd/-**
**Assistant Returning Officer & District Deputy Registrar, Co-operative Societies, Thane.**

SEAL

**Sd/-**
**Returning Officer & District Collector/Magistrate, Thane District.**

## सीडीएमओ कार्यक्रमाचे कमर्शियल एक्सीक्यूशन सुरु

**मुंबई :** मोरेपेन लॅबोरेटरीज लिमिटेडने आर्थिक वर्ष 2025-26 च्या चौथ्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत कंपनीचा निव्वळ नफा 69 टक्क्यांनी वाढून 20 कोटी रुपयांवर पोहोचला असून एकूण महसूल 22 टक्क्यांनी वाढून 472 कोटी रुपये झाला आहे. निर्यात व्यवसायातील वाढ आणि मेडिकल डिव्हाइसेस व्यवसायातील विस्तारामुळे ही वाढ साध्य झाल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. कंपनीच्या ऍक्टिव्ह फार्मास्युटिकल इंग्रेडिएंट व्यवसायात चौथ्या तिमाहीत 17 टक्के वाढ झाली, तर मेडिकल डिव्हाइसेस व्यवसायात 31 टक्क्यांची वाढ झाली. संपूर्ण आर्थिक वर्ष आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये कंपनीचा स्टँडअलोन एकूण महसूल 1,700 कोटी रुपयांपेक्षा अधिक झाला असून तो मागील वर्षाच्या तुलनेत 8 टक्क्यांनी अधिक आहे. संचालक मंडळाने आर्थिक वर्ष 2026 साठी भागधारकांना 10 टक्के लाभांश देण्याची शिफारस केली आहे.

## फुटबॉल चाहत्यांसाठी 'बिग गेम, बिगर स्क्रीन, बिगेस्ट मोमेंट्स' मोहीम

**मुंबई :** सॅमसंग इंडियाने आज फुटबॉल चाहत्यांसाठी आपल्या व्हिजन एआय बिग टीव्हींवर विशेष ऑफर्स जाहीर केल्या. 'बिग गेम, बिगर स्क्रीन, बिगेस्ट मोमेंट्स' ही मोहीम फुटबॉल चाहत्यांना एआय सॉकर मोड असलेल्या सॅमसंग व्हिजन एआय टीव्हींच्या माध्यमातून खेळाचा थरार आपल्या घरी आणण्याची संधी देते. सॅमसंगच्या २०२६ मधील व्हिजन एआय टीव्ही श्रेणीमध्ये उपलब्ध असलेला हा एआय सॉकर मोड फुटबॉलचा चेंडू अधिक स्पष्टपणे फिरताना दिसण्यासाठी, आकर्षक रंगसंगतींसाठी आणि स्टेडियमसारखाच उत्कृष्ट आवाज देण्यासाठी रिअल-टाइम सीन्सचे विश्लेषण करून फुटबॉल पाहण्याचा आनंद वाढवतो.

## सोनी सबचा हस्तिनापुर के वीर

सोनी सबचा हस्तिनापुर के वीर महाभारताच्या कमी परिचित कथांना नव्या रूपात सादर करत प्रेक्षकांना भुरळ घालत आहे. हस्तिनापुराचे भविष्य घडवणाऱ्या घटनांवर प्रकाश टाकत हा शो पुढे सरकत आहे. पांडव जेव्हा राज्यात स्थिरावतात आणि जनतेचा विश्वास व आदर मिळवू लागतात, तेव्हा त्यांच्या वाढत्या उपस्थितीमुळे राजघराण्यातील समीकरणे बदलू लागतात. यामुळे नवे आव्हान निर्माण होते आणि पांडव-कौरवांच्या दंतकथात्मक वैराची पायाभरणी होते.

## पुष्पा इम्पॉसिबलमध्ये उबदार आठवणीं

सोनी सबचा पुष्पा इम्पॉसिबल आपल्या प्रेक्षकांना सतत भुरळ घालत आहे आपुलकीची पात्रे, हृदयाला भिडणारी कथा आणि आकर्षक नाती यामुळे. कथानकाला नवा ट्विस्ट देत आहे कदंबरीचा पुनरागमन, जीची भूमिका ब्रिंदा त्रिवेदी साकारत आहे. तिच्या पुन्हा प्रवेशामुळे पुष्पाच्या आयुष्यात नवे आव्हान निर्माण होणार असून जुन्या तणावांना पुन्हा हवा मिळणार आहे.

## तहसील कार्यालय परिसर स्वच्छतेवर भर; नागरिकांनाही सहकार्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**



**कन्नड :** दि.१३ जून - तहसील कार्यालयाचा परिसर स्वच्छ, सुंदर आणि नागरिकांसाठी अधिक सुटसुटीत ठेवण्याच्या उद्देशाने तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी सारिका भगत यांच्या पुढाकारातून दि.१३ शनिवार रोजी कन्नड तहसील कार्यालयात विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या मोहिमेत महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत परिसराची साफसफाई केली.

जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत कार्यालय परिसरातील कचरा, अनावश्यक झाडाझुडपे व इतर टाकाऊ वस्तू हटवून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. स्वच्छ आणि शिस्तबद्ध कार्यालयीन वातावरण निर्माण करण्यासाठी सर्वांनी सामूहिक जबाबदारीने सहभाग नोंदविला. यावेळी तहसीलदार सारिका भगत यांनी, “तहसील कार्यालयाचा परिसर कायमस्वरूपी स्वच्छ राहण्यासाठी केवळ प्रशासन नव्हे तर नागरिकांनीही आपले कर्तव्य ओळखून आवश्यक सहकार्य करणे गरजेचे आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता स्वच्छतेची सवय अंगीकारल्यास स्वच्छ परिसराचे उद्दिष्ट सहज साध्य होऊ शकते,” असे आवाहन केले. स्वच्छता अभियानामुळे तहसील कार्यालय परिसर अधिक स्वच्छ व नीटनेटका झाला असून, भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे स्वच्छतेबाबत जनजागृती सुरू ठेवण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## 'गारंबीचा बापू' चित्रपटाचे उत्कंठावर्धक पोस्टर प्रदर्शित

**छत्रपती संभाजीनगर :** साहित्यकर्मी, कादंबरीकार श्री. ना. पेंडसे लिखित मराठी रंगभूमी आणि साहित्यविश्वात रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी अत्यंत लोकप्रिय कलाकृती आता मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होणार आहे. मराठी रंगभूमी आणि साहित्यविश्वात रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवलेले, अत्यंत गाजलेले आणि प्रेक्षकांचे लाडके नाटक 'गारंबीचा बापू' आता एका चित्रपटाच्या रूपात प्रेक्षकांसमोर येणार असून 'निर्णय', 'हिरकणी' ( बाबासाहेब पुरंदरे लिखित ), 'योद्धा' यांसारखे दर्जेदार मराठी चित्रपट तसेच अमेझॉन प्राईमवरील 'मिसेस ॲण्ड मिस्टर खुराना' वेबसीरिजचे दिग्दर्शक गुरुप्रसाद इनामदार या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत.

गुरूप्रसाद फिल्म्स प्रस्तुत 'गारंबीचा बापू - गोष्ट एका वाघाची ' या आगामी मराठी चित्रपटाचे पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर झळकले असून या घोषणेमुळे सिनेसृष्टी आणि प्रेक्षकांसह साहित्य वर्तुळातही मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. यापूर्वीही या विषयावर नाटक येऊन गेले असले तरीही नव्या काळाचे प्रगत तंत्रज्ञान आणि एका वेगळ्या भव्य दृष्टिकोनाचा मिलाफ साधत ही अजरामर कथा पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर जिवंत होणार आहे.

## एलजीचे एआय होम इकोसिस्टम सादर

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** एलजी इलेक्ट्रॉनिक्सने कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित होम इकोसिस्टमची दृष्टी सादर करत 'झिरो लेबर होम'कडे वाटचाल करणारा रोडमॅप जाहीर केला आहे. बुद्धिमान तंत्रज्ञानाच्या मदतीने घरातील दैनंदिन कष्ट कमी करून जीवन अधिक सुलभ आणि सुखकर बनविण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. भविष्यातील घर हे केवळ विविध उपकरणे जोडणारे नसून घरातील सदस्यांच्या गरजा समजून घेणारे आणि त्यानुसार कार्य करणारे असावे, असा एलजीचा विश्वास आहे. यासाठी कंपनीने एआय-सक्षम उपकरणे, थिनक्यू एआय ऑर्केस्ट्रेशन आणि स्वायत्त होम रोबोट्स या तीन प्रमुख स्तंभांवर आधारित एआय होम इकोसिस्टम विकसित केली आहे.

## कार्यालय ग्रुप ग्रामपंचायत पिशोर, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

## आठवडी बाजार जाहीर प्रगटण

सर्व ग्रामस्थ व गुत्ता पद्धतीने आठवडी बाजार लिलाव घेणाऱ्यांना या जाहीर प्रगटना द्वारे कळविण्यात येते की, मौजे पिशोर ता. कन्नड. जि. छत्रपतीसंभाजीनगर येथील आठवडी बाजार व नवीन जनावरे दाखल्यास सन 2026 ते 2027 करीता दि. 15/06/2026 सोमवार सकाळी 11-30 वाजता ग्रामपंचायत कार्यालय पिशोर येथे जाहिर लिलाव करण्याचे ठरले आहे. (न झाल्यास सदर लिलाव दि. 17/06/2026 बुधवार रोजी ठेवण्यात येईल) तरी गरजूनी वेळेवर उपस्थित राहावे.

**बाजार लिलाव अटी व शर्ती खालील प्रमाणे ठरविण्यात आलेल्या आहेत.**

- बाजार लिलाव भाग घेण्यासाठी रुपये ५०.०००/-(पन्नास हजार रू ) अनामत भरावी लागेल.
- जनावरांचा दाखला भाग घेण्यासाठी रुपये ५०००/-( पाच हजार रु) अनामत भरावी लागेल.
- शेणखत दाखला भाग घेण्यासाठी रुपये २०००/-(दोन हजार) अनामत भरावी लागेल.
- ग्रामपंचायच्या थकबाकीदारांना लिलावात भाग घेता येणार नाही.
- बाजार लिलावाची मुदत दि.१६/६/२०२६ ते दि. ३१/३/२०२७ पर्यंत एक वर्षासाठी राहील.
- लिलावात भाग घेण्यासाठी स्वतःचे रहिवासी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक.
- गुत्तेदारास ग्रामपंचायतने ठरवून दिलेल्या दर पत्रिका प्रमाणे बाजार कर ( टॅक्स ) वसुल करावे लागेल. व ग्रामपंचायतच्या व्यवहारास बंधनकारक राहावे लागेल.
- लिलावाची बोली तीन बार झाल्यानंतर अनामत रक्कमेसह आठ दिवसाच्या आत संपूर्ण रक्कम ग्रामपंचायतला भरणा करावी लागेल नसता संपूर्ण रक्कम जप्त करुन नवीन लिलाव बाबत कार्यवाही करून ग्रामपंचायतला नुकसान असल्यास संबंधित गुत्तेदारास जबाबदार धरण्यात येईल.
- बाजार लिलावाचे संपूर्ण अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवले आहे.
- नैसर्गिक कारणाने व इतर कारणामुळे बाजार भरणे बंद झाल्यास लिलाव रकमेत कोणतीही सूट दिली जाणार नाही.
- योग्य किमत न आल्यास बाजार लिलाव पुढे ढकलण्यात येईल व अनामत भरलेल्या लोकांची अनामत नवीन लिलाव होईपर्यंत ग्रामपंचायत मध्ये जमा ठेवण्यात येईल.
- इतर नियम व अटी वेळेवर वाचून दाखवण्यात येथील.

ग्रामपंचायत अधिकारी
**श्री. डी. टी. ढेपले**

प्रशासक समिती सदस्य
**श्री. बाळासाहेब राऊबा जाधव**

प्रशासक
**सौं. सरलाबाई ज्ञानेश्वर डहाके**

**सर्व प्रशासकीय समिती सदस्य ग्रुप ग्रामपंचायत पिशोर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर**

## अग्रलेख

# गरजूंच्या आलिंगनांचे भविष्य

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर तृणमूल काँग्रेसची अक्षरशः धूळधाण झाली आहे. सलग तीन विधानसभा निवडणुकांत विजय मिळाल्यानंतर ममता बॅनर्जी आणि त्यांचा पक्ष उन्मत्त झाला होता. त्या पक्षाच्या नेत्यांना अहंकार चढला होता, गुंडागर्दी मोठ्या प्रमाणात वाढली होती. राज्यातील जनतेने धडा शिकवल्यानंतर पंतप्रधानपदाची स्वप्ने पाहणाऱ्या ममता बॅनर्जी यांचे डोळे उघडल्यासारखे दिसत आहेत. दिल्लीत येऊन त्या इंडिया आघाडीच्या बैठकीत सहभागी झाल्या; एवढेच नव्हे तर काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांचीही त्यांनी भेट घेतली. या भेटीनंतरच तृणमूल काँग्रेसच्या काँग्रेसमधील विलीनीकरणाची चर्चा सुरू झाली. अजून याबाबत दोन्ही पक्षांकडून अधिकृतपणे काहीही सांगितले जात नसले, तरी या चर्चेत तथ्य नाही, असे म्हणता येत नाही. ममता बॅनर्जी यांचा पक्ष त्यांच्या राज्यात छटाकभर उरला आहे. उरलासुरला पक्ष टिकवण्यासाठी म्हणण्यापेक्षा आपले राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी ममतांसमोर आज नाही तर उद्या काँग्रेसमध्ये विलीन होण्याशिवाय पर्याय नाही. ममता बॅनर्जी या तशा मूळ काँग्रेसीच आहेत. काँग्रेसमधून बाहेर पडत त्यांनी तृणमूल काँग्रेसची स्थापना केली होती. काँग्रेसचा हात सोडत हाती घेतलेले 'दोन पत्तीवाले फूल' आता त्यांच्या हातातून निसटू पाहते आहे. त्यामुळे त्यांची अवस्था अतिशय केविलवाणी झाली आहे.

डाव्यांच्या गुंडागर्दीच्या विरोधात सर्वसामान्य जनतेने २०११ मध्ये पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसला सत्तेवर आणले होते. पण, तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी माकपच्या गुंडांच्या पावलावर पाऊल टाकून चालायला कधी सुरुवात केली, हे त्यांनाही समजले नाही. राज्यातील हिंदू जनतेवरील तृणमूल काँग्रेसच्या नेत्या-कार्यकर्त्यांवर अत्याचार वाढले होते. त्यांच्या पक्षाच्या आमदार आणि खासदारांनाही कुणी मोजत नव्हते. त्यांचा अपमान केला जात होता. त्याचीच परिणती म्हणजे तृणमूल काँग्रेसचा विधानसभा निवडणुकीत पराभव होऊन एक महिना व्हायच्या आतच त्यांच्या विधिमंडळ पक्षात फूट पडली.

तृणमूल काँग्रेसचा पराभव करीत राज्यातील जनतेने ममता बॅनर्जी यांच्या पक्षाला नाकारले. विधानसभा निवडणुकीत त्या लढत असलेल्या मतदारसंघातील जनतेने त्यांचा पराभव करीत ममतांची जागा दाखवून दिली. तृणमूल काँग्रेसमध्ये ममता बॅनर्जी यांच्याबद्दल नाराजी आणि असंतोष आहेच; त्यांचे भाचे आणि पक्षातील दुसऱ्या क्रमांकाचे स्वयंघोषित नेते तसेच कोणतीही लायकी आणि कर्तृत्व नसताना स्वतःला ममता बॅनर्जी यांचे राजकीय उत्तराधिकारी समजणारे अभिषेक बॅनर्जी यांच्याबद्दल तर तीव्र असंतोष आणि नाराजी आहे. तृणमूल काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षात जी फूट पडली आणि संसदीय पक्षात जी फूट पडण्याच्या मार्गावर आहे, त्याचे मूळ हे अभिषेक बॅनर्जी आहेत. महाराष्ट्रात शिवसेना उबाठाचे नेते उद्धव ठाकरे पुत्रमोहामुळे जसे आंधळे झाले होते, तसेच पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी भाचामोहाने आंधळ्या झाल्या आहेत. आपल्या भाच्याच्या राजकीय महत्त्वाकांक्षेपुढे त्यांना काहीही दिसत नाही. अद्यापही त्या अभिषेक बॅनर्जी यांच्या तालावर नाचत आहेत; त्यांच्या इशाऱ्यावर काम करीत आहेत.

सोनिया गांधींनी ममता बॅनर्जी यांना काँग्रेसचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तर अभिषेक बॅनर्जी यांना पक्षात महासचिव करण्याचा प्रस्ताव ठेवला, असे म्हणतात. दुसरीकडे, ममता बॅनर्जी यांचा पार राजकीय पाडाव करण्याची शपथच अभिषेक बॅनर्जी यांनी घेतली आहे, असे दिसते. तसे नसते, तर त्यांनी स्वतःसाठी राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपदाची मागणी केली नसती. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगेच राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आहेत. आत्ता ममता बॅनर्जी यांना आपल्या पक्षात घेण्याची तशी फारशी गरज काँग्रेसला नाही. काँग्रेसमध्ये आपला पक्ष विलीन करण्याची राजकीय गरज ममता बॅनर्जी यांना आहे. त्यामुळे संपलेल्या राजकीय पक्षातील, त्याहून संपलेल्या त्या पक्षाच्या नेत्यासाठी काँग्रेस राज्यसभेतील आपले विरोधी पक्षनेतेपद सोडेल, असे वाटत नाही. संसदीय लोकशाहीत विरोधी पक्ष सशक्त असलाच पाहिजे. लोकशाहीच्या अस्तित्वासाठी ते आवश्यक आहे. आज प्रमुख विरोधी पक्ष असलेला काँग्रेस पक्षाला घरघर लागलेली आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असले, तरी त्यावर अंकुश ठेवायला सतर्क आणि जागरूक विरोधी पक्षाची गरज असते. काँग्रेस पक्ष जेव्हा सत्तेवर होता, तेव्हा भाजपाने प्रमुख आणि जबाबदार विरोधी पक्षाची भूमिका अतिशय परिणामकारकपणे बजावली होती. आज मात्र दुर्दैवाने देशात विरोधी पक्षच दिसत नाही. केंद्रातील मोदी सरकारसमोर विरोधी पक्षांचे कोणतेच आव्हान नाही. सरकारसाठी हे चांगले असले तरी लोकशाहीसाठी हे योग्य नाही. सरकार लोककल्याणाचे आणि विकासाचे कितीही काम करीत असले, तरीही व्यापक कल्याणकारी भूमिकांसाठी विरोधी पक्षांचे महत्त्व आणि गरज नाकारता येणार नाही. त्यामुळे विरोधी पक्ष टिकला पाहिजे आणि जगलाही पाहिजे. परंतु, विरोधी पक्ष टिकवण्याची जबाबदारी सरकारची नसते. ती विरोधी पक्षांचीच आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षाची स्थिती अत्यवस्थ रुग्णासारखी झाली आहे. त्यामुळे तृणमूल काँग्रेस काँग्रेसमध्ये विलीन झाली तर दोन्ही पक्षांना पश्चिम बंगालपुरता थोडाफार फायदा होऊ शकतो. आज पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस औषधालाही उरलेली नाही आणि विधानसभा निवडणुकीनंतर तृणमूल काँग्रेसही आचके देत आहे. त्यामुळे या चर्चित विलीनीकरणाचा फायदा पश्चिम बंगालमध्ये काही प्रमाणात या दोन्ही पक्षांना मिळू शकतो. एकदुसऱ्याच्या गुणदोषांचा विचार न करता या दोघांना एकदुसऱ्याला स्वीकारावे लागेल आणि पुढे जावे लागेल. ममता बॅनर्जींचा स्वभाव खाष्ट सासूबाईंसारखा आहे. त्या अशा प्रयोगात स्वतःशी कितपत तडजोडी करू शकतील, हा प्रश्नच आहे.

देशात १९७७ मध्ये जनता पक्षाचा प्रयोग झाला होता, त्यावेळी देशात काँग्रेस पक्ष सत्तेवर होता आणि मजबूत होता. याच्या उलट विरोधी पक्ष अतिशय कमजोर आणि विखुरलेला होता. बलाढ्य अशा काँग्रेसचा मुकाबला करण्यासाठी तेव्हाचे सर्व विरोधी पक्ष एकत्र आले आणि त्यांनी जनता पक्षाची मोट बांधली होती; ती फार काळ टिकू शकली नाही, हा भाग वेगळा. जनता पक्षाच्या स्थापनेला तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी लावलेल्या आणिबाणीचीही पृष्ठभूमी होती. आज पुन्हा एकदा असाच प्रयोग करून पाहणे ही काँग्रेसची राजकीय गरज झाली आहे. त्यामुळे असा प्रयोग नजीकच्या भविष्यात झाला तरी नवल वाटू नये. मुळात देशातील बहुतांश प्रादेशिक पक्ष हे काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या नेत्यांनी स्थापन केले आहेत. त्यामुळे स्वतःच्या राजकीय अस्तित्वासाठी अशा मूळ काँग्रेसी विचारधारेच्या सर्व नेत्यांच्या घरवापसीच्या पर्यायाचा विचार काँग्रेसला करावा लागणार आहे. तृणमूल काँग्रेसने तशी सुरुवात करून दिली आहे, असे म्हणायला हरकत नाही. मात्र, अशी हातमिळवणी पुढे नेताना काँग्रेसलाही आत्मपरीक्षण करावे लागेल. आपले काय चुकले, याचा आढावा घ्यावा लागेल आणि सुधारावे लागेल. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे देशातील जनतेचा विश्वास जिंकावा लागेल. देशातील जनतेचा भाजपावर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर विश्वास आहे. मोदींच्या हातात देश सुरक्षित आहे आणि मोदींच्या नेतृत्वातच देश विकसित भारताचे लक्ष्य गाठू शकतो, याची लोकांना खात्री आहे. जोपर्यंत देशातील जनतेला असे वाटत राहील तोपर्यंत काँग्रेसने असे कितीही वेगवेगळे प्रयोग केले तरी त्याचा फार फायदा होईल, असे वाटत नाही. पण, राजकारण हे अनिश्चिततेचे क्षेत्र आहे. त्यात विचारसरणी वगैरे आता तशी राहिलेली नाही. आता गरज महत्त्वाची असते. अस्तित्व महत्त्वाचे असते. प्रश्न असा की, ममता बॅनर्जींना आज गरज असल्याचे दिसते तशी ती अन्य प्रादेशिक पक्षांना आहे काय आणि ते सोनिया-राहुलबाबा यांच्या नेतृत्वात काम करायला तयार होतील काय? कारण गरजूंच्या आलिंगनांचे कधीच काही खरे नसते. आज गळाभेट करतील तर उद्या नागिन-सपेराचा खेळही खेळतील. इंडिया आघाडीतल्या घटक पक्षांचा कलगीतुरा हा ताजा इतिहास आहे. ■

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# गिटहब : तंत्रज्ञान विश्वाचे खुले विद्यापीठ

जगभरातील लाखो प्रोग्रामर, संशोधक, विद्यार्थी आणि तंत्रज्ञान कंपन्या ज्या माध्यमातून एकत्र येऊन सॉफ्टवेअर तयार करतात, त्यात सुधारणा करतात आणि ज्ञानाची देवाणघेवाण करतात. त्या आधुनिक डिजिटल व्यासपीठाचे नाव गिटहब. आजच्या आयटी विद्यार्थ्यांसाठी गिटहब हे केवळ कोड साठवण्याचे साधन राहिलेले नाही, तर ते कौशल्य सिद्ध करणारे, करीअर घडवणारे आणि जागतिक स्तरावर ओळख निर्माण करून देणारे डिजिटल व्यक्तिमत्त्व बनले आहे. गिटहबची सुरुवात २००८ ला झाली. लिनक्स प्रणालीचे निर्माते लिनस टॉर्वाल्ड्स यांनी विकसित केलेल्या 'गिट' या व्हर्जन कंट्रोल प्रणालीवर आधारित हे व्यासपीठ निर्माण करण्यात आले. सॉफ्टवेअर विकसित करताना अनेक विकासक एकाच वेळी काम करतात. कोणत्या व्यक्तीने कोणता बदल केला, जुन्या आवृत्तीकडे कसे परत जायचे, चूक कुठे झाली हे कसे शोधायचे अशा अनेक अडचणी सॉफ्टवेअर उद्योगासमोर होत्या. गिट या तंत्रज्ञानाने या समस्या सोडवल्या आणि गिटहबने त्याला जगभर पोहोचवले. पुढे मायक्रोसॉफ्टने गिटहबचे अधिग्रहण केल्यानंतर कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाऊड आणि आधुनिक विकास साधनांच्या मदतीने त्याची प्रचंड वाढ झाली. गिटहबचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याची मुक्त आणि सहकार्यपूर्ण संस्कृती. पूर्वी सॉफ्टवेअर्सचा विकास काही कंपन्या किंवा बंद प्रयोगशाळांपुरता मर्यादित होता. परंतु गिटहबमुळे ज्ञानाचे लोकशाहीकरण झाले. कारण याद्वारे भारतातील एखादा विद्यार्थी अमेरिकेतील, जपानमधील किंवा युरोपमधील विकासकांसोबत एकाच प्रकल्पावर काम करू शकतो. भाषेच्या, देशाच्या आणि अंतराच्या सीमा ओलांडून तंत्रज्ञान क्षेत्रात जागतिक सहकार्याची नवी संस्कृती गिटहबने निर्माण केली.

आज जगातील अनेक महत्त्वाचे ओपन सोर्स प्रकल्प गिटहबवर विकसित होतात. लिनक्स, पायथन, अँड्रॉईड, टेन्सरफ्लो यांसारख्या तंत्रज्ञानांनी जग बदलले आणि त्यामागे ओपन सोर्स संस्कृतीची मोठी ताकद होती. ओपन सोर्स म्हणजे सर्वांसाठी खुले असलेले तंत्रज्ञान. आता अनेक आयटी कंपन्या विद्यार्थ्यांचे गिटहब प्रोफाईल पाहतात. कारण गिटहबवर विद्यार्थ्यांने केलेले प्रत्यक्ष प्रकल्प, त्याची कोडिंग शैली, समस्या सोडवण्याची क्षमता आणि सातत्य स्पष्ट दिसते. एखाद्या विद्यार्थ्यांने स्वतः तयार केलेले संकेतस्थळ, मोबाईल ॲप, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणाली किंवा सायबर सुरक्षा प्रकल्प गिटहबवर उपलब्ध असल्यास मुलाखतीत त्याचा अधिक प्रभाव पडतो. कंपन्यांना अशा विद्यार्थ्यांचा अधिक विश्वास वाटतो. कारण त्यांनी प्रत्यक्ष काम केलेले असते. गिटहब विद्यार्थ्यांसाठी डिजिटल पोर्टफोलिओचे काम करते. कलाकार, लेखक जसे आपले कौशल्य प्रदर्शित करतात, तसेच प्रोग्रामर आपले कौशल्य गिटहबवर प्रदर्शित करतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची जागतिक स्तरावर ओळख निर्माण होते. अनेक वेळा परदेशातील कंपन्या आणि संशोधन संस्था विद्यार्थ्यांचे गिटहब प्रोफाईल पाहून इंटर्नशिप किंवा नोकरीच्या संधी देतात. आज कृत्रिम बुद्धिमत्ता आणि गिटहब यांचे नाते दृढ होत आहे. एआय आधारित कोडिंग सहायकांमुळे सॉफ्टवेअर विकासाची पद्धत बदलत आहे. विद्यार्थ्यांना कोड लिहिताना मार्गदर्शन मिळते, चुका कमी होतात आणि नवी भाषा शिकणे सोपे होते. गिटहब वापरताना विद्यार्थ्यांनी काही बाबींची विशेष काळजी घ्यावी. फक्त इंटरनेटवरून कोड कॉपी करून अपलोड करणे हा योग्य मार्ग नाही. स्वतः विचार करून लहान का होईना, पण स्वतंत्र प्रकल्प तयार करणे अधिक महत्त्वाचे आहे. सातत्याने नवीन गोष्टी शिकणे, प्रकल्प अद्ययावत ठेवणे आणि तांत्रिक लेखन सुधारणे आवश्यक आहे. प्रकल्पाचे योग्य वर्णन, त्याचा उपयोग आणि वापरलेल्या तंत्रज्ञानाची माहिती स्पष्टपणे लिहिल्यास विद्यार्थ्यांची व्यावसायिकता दिसून येते. गिटहब हे विद्यार्थ्यांसाठी डिजिटल पोर्टफोलिओचे काम करते. कलाकार जसा आपली चित्रे दाखवतो, लेखक जसे आपले लेखन प्रकाशित करतो, तसेच प्रोग्रामर आपले कौशल्य गिटहबवर प्रदर्शित करतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची जागतिक स्तरावर ओळख निर्माण होते. गिटहब हे करीअरच्या दृष्टीने महत्त्वाचे व्यासपीठ ठरले आहे.




गिटहब प्रभावीपणे शिकण्यासाठी आज अनेक प्रशिक्षण पर्याय उपलब्ध आहेत. विविध अभियांत्रिकी महाविद्यालये, आयटी प्रशिक्षण संस्था आणि ऑनलाईन शिक्षण व्यासपीठांवर गिट आणि गिटहबचे विशेष अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. सुरुवातीला विद्यार्थ्यांनी व्हर्जन कंट्रोल, रेपॉझिटरी तयार करणे, कमिट, ब्रँच, मर्ज आणि पुल रिक्वेस्ट यांसारख्या मूलभूत संकल्पना शिकणे आवश्यक असते. त्यानंतर ओपन सोर्स प्रकल्पांमध्ये सहभाग, टीम सहकार्य आणि क्लाऊड आधारित विकास या प्रगत गोष्टी शिकता येतात. आज अनेक जागतिक शिक्षण मंचांवर मोफत तसेच सशुल्क प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. मायक्रोसॉफ्ट, गिटहब आणि क्लाऊड तंत्रज्ञानाशी संबंधित प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांच्या करीअरला अतिरिक्त विश्वासार्हता देतात. काही कंपन्या विद्यार्थ्यांच्या गिटहब योगदानासोबत त्यांची प्रमाणपत्रेही तपासतात. त्यामुळे केवळ सैद्धांतिक शिक्षण न घेता प्रत्यक्ष प्रकल्पांसह प्रमाणित प्रशिक्षण घेणे ही काळाची गरज बनली आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता आणि गिटहब यांचे नाते अधिक दृढ होत आहे. एआय आधारित कोडिंग सहायकांमुळे सॉफ्टवेअर विकासाची पद्धत बदलत आहे. विद्यार्थ्यांना कोड लिहिताना मार्गदर्शन मिळते, चुका कमी होतात आणि नवीन भाषा शिकणे सोपे होते. भविष्यात एआयच्या मदतीने अधिक वेगवान आणि बुद्धिमान सॉफ्टवेअर विकास होणार आहे.

गिटहब वापरताना विद्यार्थ्यांनी काही गोष्टींची विशेष काळजी घ्यायला हवी. फक्त इंटरनेटवरून कोड कॉपी करून अपलोड करणे हा योग्य मार्ग नाही. स्वतः विचार करून लहान का होईना, स्वतंत्र प्रकल्प तयार करणे अधिक महत्त्वाचे आहे. सातत्याने नवीन गोष्टी शिकणे, प्रकल्प अद्ययावत ठेवणे आणि तांत्रिक लेखन सुधारणे आवश्यक आहे. प्रकल्पाचे योग्य वर्णन, त्याचा उपयोग आणि वापरलेल्या तंत्रज्ञानाची माहिती स्पष्टपणे लिहिल्यास विद्यार्थ्यांची व्यावसायिकता दिसून येते. भविष्यात गिटहबचे महत्त्व आणखी वाढणार आहे. क्लाऊड आधारित विकास, सायबर सुरक्षा, मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि इंडस्ट्री ५.० या क्षेत्रांमध्ये जागतिक सहकार्य वाढेल. भविष्यात पदवीपेक्षा कौशल्याला अधिक महत्त्व असेल आणि त्या कौशल्याचा पुरावा म्हणजे गिटहब प्रोफाईल असेल. आजचा आयटी विद्यार्थी गिटहब प्रभावीपणे वापरत असेल तर केवळ नोकरी शोधणारा उमेदवार राहत नाही; तर जागतिक तंत्रज्ञान समुदायाचा सक्रिय निर्माता बनतो. ज्ञान, सहकार्य, नवकल्पना आणि सतत शिकण्याची वृत्ती यांचा संगम म्हणजे गिटहब. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांने गिटहबकडे केवळ एक संकेतस्थळ म्हणून न पाहता स्वतःच्या डिजिटल भविष्याची प्रयोगशाळा म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**विजय कुळकर्णी**

# 'तो' शिरविरहित मृतदेह कोणाचा?

बुलढाणा जिल्ह्यात जळगाव जामोद तालुक्यातील राजुरा शिवारात मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात एका शिरविरहित महिलेचा मृतदेह आढळला होता. याप्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी एका व्यक्तीला त्याच्या मुलासह हत्येच्या प्रकरणात अटक केली होती. त्या व्यक्तीने त्याच्या मुलीच्या हत्येचा आरोप करण्यात आला होता. मात्र, ज्या मुलीच्या हत्येच्या प्रकरणात त्या बापलेकाला अटक केली होती, ती मुलगी ९-१० दिवसांपूर्वी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात हजर झाली आणि मी जिवंत असताना माझ्या वडील व भावाला माझ्या हत्येच्या आरोपात अटक का केली; त्यांना सोडा, असे पोलिसांना ठणकावून सांगितले. त्यामुळे पोलिस अधिकारी व कर्मचार्‍यांची चांगलीच तंतरली. त्यांनी त्या बापलेकाला सोडून दिले. पण, ज्या महिलेचा शिरविरहित मृतदेह आढळला तो कोणाचा? याचे उत्तर आता पोलिस शोधत आहेत. दरम्यान, या प्रकरणी ठाणेदार नितीन पाटील व एलसीबीचे पोलिस निरीक्षक सुनील अंबुलकर यांना निलंबित करण्यात आले आहे. ही कारवाई केवळ काही पोलिस अधिकाऱ्यांवर निलंबनाची अथवा विभागीय चौकशी करण्यापुरतेच याकडे न पाहता संपूर्ण पोलिस यंत्रणेने गंभीर प्रकरणांचा तपास गांभीर्याने व त्रुटीविरहित केला जावा, असा धडा यातून घेतला पाहिजे.

याप्रकरणी तपास यंत्रणेने आज उपलब्ध असलेल्या विविध अत्याधुनिक व वैज्ञानिक पद्धतींचा उपयोग करणे आवश्यक होते. त्या बापलेकाला ताब्यात घेतल्यावर त्या शिरविरहित महिलेचा मृतदेह व त्या बापलेकाची डीएनए चाचणी करणे आवश्यक होते. पण, वरिष्ठांकडून शाबासकी मिळविण्याच्या नादात अतिआत्मविश्वासाने त्या दोघांना अटक करून प्रकरणाची उकल केल्याचे समाधान मानण्यात आले. वैज्ञानिक तपास न केल्याने अनेकदा गुन्हेगार न्यायालयातून सबळ पुराव्याअभावी सुटण्याची शक्यता अधिक असते. तेव्हा, तपास यंत्रणांची प्रत्येक कृती, प्रत्येक निर्णय आणि पुरावा अत्यंत महत्त्वाचा असतो. गुन्हेगारापर्यंत पोहोचण्याचा मार्ग पुराव्यांच्या साखळीतूनच जातो. गुन्हा सिद्ध होईपर्यंत ती व्यक्ती आरोपी नसते. निर्दोष असते. म्हणून दोषी व्यक्ती सुटू नये, याची संपूर्ण जबाबदारी तपास यंत्रणांची असते. तेव्हा, तपासातील निष्काळजी व हलगर्जीपणा किंवा प्रक्रियात्मक चुका केवळ एखाद्या अधिकाऱ्याच्या सेवापुस्तकामध्ये काळा ठपकाच उमटवित नाही तर संपूर्ण न्यायप्रक्रियेवर परिणामकारक ठरते. अनेकदा पुरावे योग्य प्रकारे जतन न केल्याने किंवा घटनास्थळाचा वैज्ञानिक तपास न झाल्याने गंभीर गुन्ह्यातील आरोपी न्यायालयातून निर्दोष सुटतात. त्याचा परिणाम समाजमनावर होतो. याप्रकरणी विभागीय चौकशी केल्यावर संबंधित अधिकार्‍यांना निलंबित करण्यात आले. त्यावरून या प्रकरणाच्या तपासात गंभीर त्रुटी असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. अधिकाऱ्यांचे निलंबन म्हणजे काही अंतिम शिक्षा नव्हे. पण, जबाबदारी निश्चित करण्याची पहिली पायरी आहे. अधिकारी कितीही मोठा असला तरीही तपासातील चुका दुर्लक्षित केल्या जाऊ शकत नाहीत. अधिकारी जेवढा मोठा असेल तेवढी त्याची जबाबदारी मोठी असते. गुन्हे उघड करण्यासाठी विविध अत्याधुनिक व वैज्ञानिक तपास पद्धती आज उपलब्ध आहेत. यामध्ये डीएनए तपासणी, डिजिटल पुरावे, फॉरेन्सिक चाचणी आणि सायबर विश्लेषण यामुळे तपासाच्या पद्धती अधिक प्रगत झाल्या आहेत. या सर्व साधनांचा वापर करण्यासाठी तपास अधिकाऱ्यांना सातत्याने प्रशिक्षण व अद्ययावत ज्ञानाची गरज आहे. आज ग्रामीण भागातील अनेक पोलिस ठाण्यात मनुष्यबळाची कमतरता, तांत्रिक साधनांचा अभाव आणि कामाचा प्रचंड ताण ही वस्तुस्थिती आहे. पोलिसांच्या कार्यक्षमतेवरच समाजाचा विश्वास असतो. तेव्हा, जबाबदारीने केलेला पारदर्शक तपास ही काळाची गरज आहे. या घटनेत विभागीय चौकशीनंतर संबंधित तपास अधिकार्‍यांचे निलंबन करून जबाबदारी निश्चित करण्यात आली. गुन्ह्याची चौकशी निष्पक्ष व तथ्याधारित असणे महत्त्वाचे आहे. या घटनेतून पोलिस यंत्रणेने धडा घेऊन तपास प्रक्रियेत सुधारणा करणे आवश्यक आहे. तिची कवटी फॉरेन्सिक प्रयोगशाळेत पाठविण्यात आली असून त्यावरून तिचा चेहरा तयार करण्याचा प्रयत्न सुरू आहे. तेव्हा, तपास यंत्रणेने योग्य दिशेने तपास करणे आवश्यक आहे. ■

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# साफ करा ही 'घाण...!'

ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयाबाहेर नुकतीच घडलेली घटना केवळ संतापजनक नाही, तर प्रत्येक सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिकाच्या तळपायाची आग मस्तकात घालणारी आहे. वयाची ८० ओलांडलेल्या एका आजोबांना एका मुजोर कॅबचालकाने भररस्त्यात बेदम मारहाण केली. त्यांची चूक काय होती? तर फक्त 'रस्त्यावर थुंकू नकोस' एवढीच काय ती विनंती त्यांनी त्या रिक्षाचालकाला अत्यंत सामंजस्यपणे केली होती. एखादा शहाणा माणूस असता तर त्याने आपली चूक मान्य करून 'सॉरी' म्हटले असते. मात्र, या मुजोर चालकाने थेट हातात दगड घेतला आणि वृद्धावर जीवघेणा हल्ला चढवला. या अमानुष मारहाणीत त्या वयोवृद्ध आजोबांचा पाय फ्रॅक्चर झाला आणि त्यांना रुग्णालयात शस्त्रक्रियेला सामोरे जावे लागले. भररस्त्यात पत्नीसमोर तिच्या वृद्ध पतीला रक्तबंबाळ होईपर्यंत मारले जाते, हे दृश्य पाहून कोणत्याही संवेदनशील माणसाचे रक्त खवळेल!

सार्वजनिक ठिकाणे, रस्ते आणि पदपथ म्हणजे जणू आपलीच खाजगी मालमत्ता आहे आणि रस्ते म्हणजे कचराकुंडी आहे, असे समजून वावरणार्‍या बेशिस्त लोकांची संख्या वाढत आहे. गाडी वाटेल तिथे लावायची, स्टेअरिंगवर पाय ठेवून बसायचं, मोबाईलमध्ये खेळत बसायचं, मोकळा रस्ता दिसला की खुशाल थुंकायचं आणि कोणी जाब विचारला की थेट दादागिरी करायची; हा कसला अरेरावीपणा? जेव्हा अशा छोट्या बेशिस्त वागण्याकडे समाज आणि प्रशासन सुरुवातीलाच डोळेझाक करते, तेव्हा या प्रवृत्तीला खतपाणी मिळते आणि त्यांचे धाडस इतके वाढते की, ते एका ८० वर्षांच्या वृद्धावर दगड उगारण्याइतपत निर्ढावतात. या प्रवृत्तीला वेळीच ठेचले नाही, तर ही 'घाण' संपूर्ण समाजव्यवस्थेला विळखा घालेल.

### मुंबईचं 'स्पिरिट' काय म्हणतं?

आपण नेहमी संकटात पुन्हा जोमाने उभे राहण्याला 'मुंबईचे स्पिरिट' म्हणतो. पण खऱ्या अर्थाने 'मुंबई स्पिरिट' म्हणजे केवळ अन्याय सहन करून गप्प बसणे नव्हे, तर आपल्या शहराची काळजी घेणे आणि स्वच्छतेसाठी पुढाकार घेणे. त्या वयोवृद्ध आजोबांनी दाखवलेले धाडस हेच खरे मुंबईचे स्पिरिट आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी 'स्वच्छ भारत अभियान' सुरू केले. या मोहिमेचा मूळ उद्देश केवळ शौचालये बांधणे हा नसून नागरिकांच्या वर्तनात सकारात्मक बदल घडवणे हा आहे. मात्र, जेव्हा एखादा जागरूक नागरिक या अभियानात खारीचा वाटा उचलतो आणि एका बेशिस्त माणसाला रोखतो, तेव्हा त्याला दगडाचा मार खावा लागतो. जर चांगल्या हेतूने समाजहितासाठी पुढाकार घेणार्‍याच्या वाट्याला अशी दहशत येणार असेल, तर भविष्यात 'स्वच्छ भारत' किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही मोहिमेत सामान्य नागरिक सहभागी कसा होईल? या घटनेनंतर ते वृद्ध दाम्पत्य इतके घाबरले होते की, ते स्वतःहून पोलिसांत तक्रार देण्यासाठी पुढे येत नव्हते. अखेर तब्बल १४ तासांनंतर राजकीय कार्यकर्त्यांना स्वतः फिर्यादी बनावे लागले, तेव्हा कुठे वर्तकनगर पोलिसांत गुन्हा दाखल झाला. नागरिकांचा सहभाग वाढवायचा असेल, तर त्यांना प्रशासकीय स्तरावर भक्कम सुरक्षा मिळायलाच हवी. मात्र, यावेळी 'स्वच्छतेसाठी पुढाकार घ्या, पण स्वतःचा जीव धोक्यात घालून' असा अघोषित संदेश तर, समाजात जायचा तो गेलाच. मग अशा भयंकर घटनांमुळे चांगल्या प्रवृत्तीची आणि सुसंस्कृत माणसे कायमची गप्प बसतील आणि गुंड प्रवृत्तीचे लोक रस्त्यावर उजळमाथ्याने वावरतील.

या घटनेतील एक महत्त्वाची बाब ही सकारात्मक दिसली. या घटनेनंतर समाजातील एकजूट पाहायला मिळाली. एका मुद्यावरून सर्व राजकीय मतभेद विसरून शिवसेनेचे दोन्ही गटांचे पदाधिकारी, भाजपा-मनसेचे पदाधिकारी एकत्र आल्याचे पाहायला मिळाले. त्यांनी या मुजोर चालकाला शोधून काढत चांगलाच चोप दिला आणि पोलिसांच्या स्वाधीन केले. या सगळ्यांनी रस्त्यावर उतरून मुजोर ओला-उबर चालकांना धडा शिकवला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या अमानुष घटनेची अत्यंत गंभीर दखल घेत, ठाणे पोलिस आयुक्तांना थेट भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ (हत्येचा प्रयत्न-जुने कलम ३०७) आणि कलम ३५२ अंतर्गत कठोर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. तसेच, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही आवर्जून फोनवरून त्या वृद्धाची आपुलकीने विचारपूस केली व तब्येतीची चौकशी करून त्यांना मदतीचा आधार दिला. ही सगळी मंडळी एका मुद्यावर एकविचाराने पुढे गेली, हे चित्र महाराष्ट्राच्या दृष्टीने एक चांगला सकारात्मक संदेश देणारे ठरले असले, तरी सामान्य माणसाला राजकारण्यांच्या मगरीच्या अश्रूंची चांगली समज आहे. त्यामुळे आता गरज आहे ती एका सक्षम आणि सुरक्षित व्यवस्थेची; जिथे चूक दाखवून दिल्यावर मारहाण सहन करावी लागणार नाही. जोपर्यंत नेतेमंडळी या मुद्याचे केवळ राजकारण करण्याऐवजी, प्रशासकीय पातळीवर कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यासाठी पावले उचलत नाहीत, तोपर्यंत अशा घटना थांबणार नाहीत.

थोडक्यात सांगायचे तर, आजोबांवरील हल्ला हा केवळ एका कॅबचालकाचा माज नाही, तर तो आपल्या राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेचाही मोठा पराभव आहे. यात बदल घडले नाहीत तर, एखादा सच्चा आणि स्वच्छतेची आस असणारा सामान्य मुंबईकर असाच रस्त्यावर मार खात राहील आणि आपले नेते केवळ बघ्याची भूमिका घेत राहतील. हा विषय केवळ एका अटकेपुरता थांबता कामा नये. या मुजोर कॅबचालकावर कायद्याचा असा बडगा उगारला गेला पाहिजे की, इथून पुढे कोणीही महाराष्ट्राच्या रस्त्यावर थुंकताना आणि कोणत्याही नागरिकावर, विशेषतः ज्येष्ठांवर हात उचलताना हजार वेळा विचार करेल. 'स्वच्छ भारत' केवळ रस्त्यावरचा कचरा उचलून होणार नाही, तर समाजातील या अशा 'घाणेरड्या आणि मुजोर' प्रवृत्तींना कायद्याचा धाक दाखवून कायमचे साफ केल्यावरच आपले शहर, राज्य आणि देश खर्‍या अर्थाने स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित राहील. ■

९२७०३३३८८६

### 'राजकारणातील विक्रमादित्य' सर्वंकष आढावा

तरुण भारतचा गुरुवार, ११ जूनमधील 'राजकारणातील विक्रमादित्य' हा श्यामकांत जहागीरदार यांचा 'दिल्ली वार्तापत्र'मधील लेख पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तपःपूर्तीच्या विक्रमाची यथायोग्य शब्दांत तपशीलवार दखल घेणारा आहे. मोदी सरकारचे वेगळेपण आहे ते, हमें देखना है, हमें करना है यापेक्षा आधी केले मग सांगितले यात. त्यामुळेच जम्मू-काश्मीरचे ३७० कलम हद्दपार करून तेथे खात्रीशीर रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी भारतीय व विदेशी उद्योगांना कवाडे उघडी करून देणे, लेह-लडाखलाही रस्ते दळणवळणाने देशांतर्गत जोडणी देऊन समृद्धीचा मार्ग खुला करणे, कोरोनासारख्या आपत्तीकाळातही योग्य ती खबरदारी घेऊन अर्थव्यवस्थेचे संतुलन जास्त गळणार नाही हे पाहणे, आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी डिजिटल क्रांतीच्या मार्गावर सर्वसामान्य नागरिकांना घेऊन पुढे जाणे, पायाभूत सुविधांच्या विकासासाठी गुंतवणुकीला प्रोत्साहन देऊन रस्ते, लोहमार्ग, हवाई मार्ग सुकर करणे, इत्यादी बाबतीत खूपच जलद प्रगती करून जागतिक पातळीवर देशाला मानाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. अर्थातच संरक्षण, शिक्षण, भ्रष्टाचार निर्मूलन, प्रदूषणमुक्त शहरे, महिला व बालकल्याण, आरोग्य सुविधा या आघाड्यांवर अधिक जोमाने अजूनही काम करावे लागणार आहे याची जाणीव ठेवून मोदी सरकार अधिक प्रयत्नांचा जोर लावेल अशी आशा या निमित्ताने करायला हरकत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे अभिनंदन.

**श्रीपाद कुलकर्णी**/९४२२५१५६४०

* * *

### नियत वाईट असलेल्यांना तुमच्या सावलीतही उभे करू नका

समाज हा सामाजिक संबंध व सामाजिक नात्यांचा समुदाय आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती एक दुसर्‍याचे सहकार्य, मदत, सामाजिक संबंध व सद्भाव यावर जगत असते. या समाजात विभिन्न मते व विचारांच्या व्यक्ती असतात. काही नकारात्मक तर काही सकारात्मक विचार उराशी बाळगून समाजात वास्तव्य करीत असतात. समाजात जगत असताना बर्‍याच व्यक्तींवर वाईट प्रसंग व घटना येत असतात, अशा वेळी समाजातील प्रत्येकाने वाईट प्रसंग आलेल्या व्यक्तीला सहकार्य करणे, त्याच्या मदतीला धावून जाणे, त्याचे सुख-दुःख वाटून घेणे, हा सामाजिक धर्म आहे. समाज धर्म प्रत्येकाने पाळायला हवा. समाज धर्म पाळणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य असायला हवे. पण नकारात्मक विचारांच्या किंवा अहित उराशी बाळगून जगणार्‍या व्यक्ती या नेहमी समाज प्रवाहाच्या विरुद्ध वागत असतात. त्या सदैव अहिताच्या बाजूनेच असतात. समाजाशी किंवा समाजातील लोकांशी त्यांना काही घेणे-देणे नसते. समाजातील ज्या व्यक्ती किंवा कुटुंबावर वाईट प्रसंग किंवा वाईट वेळ आलेली आहे अशा वेळी समाजातील सर्वांनी त्या व्यक्तीच्या पाठीशी उभे राहणे, हा समाज धर्म आहे. परंतु समाजातील ज्यांची नियत वाईट असते, ज्याची सदैव नकारात्मक भूमिका असते, अशांना तुमच्या सावलीत सुद्धा उभे करू नका.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

* * *

### तात्यांची डील आणि युद्धाचा फील

'इकडे आड आणि तिकडे विहीर' अशी आपल्या मराठीत एक म्हण आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची सध्याची परिस्थिती बघून ही म्हण आवर्जून आठवते. इराणवर हल्ला करणे त्यांना चांगलेच अडचणीत आणत आहे. युद्धबंदी जाहीर करून पाकिस्तानमार्फत डील करण्याचे असफल प्रयत्न झालेत. युद्धातून माघार घेतली तर वैयक्तिक आणि देशाची नाचक्की होते. युद्ध सुरू ठेवले तर देशांतर्गत विरोधाला सामोरे जावे लागते. ट्रम्प यांच्या धोरणांमुळे जगाचे राजकारण आणि अर्थव्यवस्था संभ्रमावस्थेत आहे. इराण-अमेरिका संघर्षामुळे अमेरिकेत महागाई वाढली असून ट्रम्प यांनी 'आय लव्ह इन्फ्लेशन' (मला महागाई आवडते) असे वादग्रस्त विधान केले आहे. ट्रम्प यांचे इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी इराण युद्धावरून संबंध चांगलेच ताणले गेलेले आहेत. ट्रम्प नेतान्याहू यांना लेबनान आणि इराणवरील हल्ले थांबवायला सांगतात आणि स्वतः अपाचे हेलिकॉप्टर इराणने पाडले असे समजून इराणवर हल्ला करतात. अमेरिका-इराण डील अगदी नजीकच्या टप्प्यात आहे असे सांगायलाही ते विसरत नाहीत. वादग्रस्त विधाने करण्याची आणि अंगावर येताच यू टर्न घेऊन सारवासारव करायची हे नित्याचेच झालेले आहे. त्यांना हवी तशी डील काही होणार नाही आणि जगावरील युद्धाचा फील जाणार नाही. चर्चेच्या माध्यमातून अमेरिका-इराण-इस्त्रायल यांच्यात डील व्हावी आणि जगावरील महायुद्धाचे सावट लवकरात लवकर दूर व्हावे असे सर्वांनाच वाटत आहे. ■

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

* * *

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### मनपाची नाला स्वच्छता मोहीम युद्धपातळीवर; आजम कॉलनी परिसरात विशेष स्वच्छता अभियान

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील नाल्यांच्या स्वच्छतेसाठी विशेष मोहीम राबविण्यात येत असून बसस्थानक परिसरातील निरज हॉटेलसमोरील नाला तसेच आजम कॉलनी परिसरात शुक्रवारी व्यापक स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

उपायुक्त तुकाराम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या मोहिमेत मुख्य स्वच्छता निरीक्षक श्रीकांत कु-हा, स्वच्छता कर्मचारी, मुकादम आणि इतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. नाल्यांमधील गाळ, कचरा आणि अडथळे दूर करण्यासाठी जेसीबी, पोकलॅड, टिप्पर तसेच विविध यंत्रसामग्रीचा वापर करण्यात आला. महानगरपालिकेच्या वतीने शहरातील प्रमुख आणि मोठ्या नाल्यांची स्वच्छता युद्धपातळीवर सुरू असून प्रभाग समिती अ, ब आणि क अंतर्गत विविध भागांमध्ये नियमित स्वच्छता मोहीम राबविली जात आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी साचू नये आणि नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

दरम्यान, शहरातील भाजी विक्रेते, फळ विक्रेते, व्यापारी तसेच नागरिकांनी आपल्या परिसरात स्वच्छता राखण्यासाठी डस्टबिनचा वापर करावा आणि घरातील कचरा केवळ घंटागाडीतच टाकावा, असे आवाहन महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर आणि स्थायी समिती सभापती प्रतिभा सरोदे यांनी केले आहे.

स्वच्छ आणि निरोगी शहरासाठी महानगरपालिकेच्या स्वच्छता मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करावे, असेही प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

### लसीकरण मोहीमेसंदर्भात महानगरपालिकेत प्रशिक्षण कार्यशाळा

**परभणी,/प्रतिनिधी:** महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत २८ जून २०२६ रोजी एक ते पाच वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ लस देण्यात येणार आहे. या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महानगरपालिका स्तरावर शुक्रवारी (दि. १२) विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

ही कार्यशाळा जागतिक आरोग्य संघटनेचे समन्वयक डॉ. मुजीब सय्यद (औरंगाबाद) आणि महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कार्यशाळेत पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा सूक्ष्म कृती आराखडा तयार करणे, लसीकरण बूथचे नियोजन, रेल्वे स्थानक, बसस्थानक, झोपडपट्ट्या, वीटभट्ट्या, खडी केंद्रे, वाडी-वस्ती तसेच बांधकाम क्षेत्रांमध्ये विशेष लसीकरण मोहीम राबविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय पोलिओ लसीची साठवणूक, वाहतूक आणि लसीकरणादरम्यान घ्यावयाची काळजी याबाबतही माहिती देण्यात आली.

डॉ. मुजीब सय्यद यांनी लसीकरण मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रत्येक बालकापर्यंत पोहोचण्याचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी आरोग्य विभागातील सर्व वैद्यकीय अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान, २८ जून रोजी होणाऱ्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत एक ते पाच वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस पाजून मोहिमेला यशस्वी करावे, असे आवाहन महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर, सभागृह नेते सय्यद समी उर्फ माजुलाला, स्थायी समिती सभापती प्रतिभा सरोदे, आरोग्य सभापती कु. अबोली कांबळे आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत यांनी केले आहे.

### बोरी अप्पर तहसील कार्यालय स्थलांतराच्या निषेधार्थ उद्यापासून बेमुदत बंद : सर्वपक्षीय बैठकीत निर्णय; व्यापारी, नागरिक व विविध संघटनांचे प्रशासनाला निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील बोरी येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर करण्याची दीर्घकालीन मागणी असतानाही शासनाने चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर केल्याने बोरी व परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या निर्णयाच्या निषेधार्थ सर्वपक्षीय नेते, व्यापारी आणि नागरिकांनी शुक्रवारी प्रशासनाला निवेदन देत १३ जूनपासून बोरी बाजारपेठ व आठवडी बाजार बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

बोरी येथील नागरिक अनेक वर्षांपासून अप्पर तहसील कार्यालयाची मागणी करत आहेत. गेल्या काही महिन्यांत या मागणीने अधिक जोर धरला होता. यासंदर्भात शासनाकडे प्रस्तावही पाठविण्यात आले होते. मात्र, अप्पर तहसील कार्यालयाची मंजुरी चारठाणा येथे झाल्याचे समोर आल्यानंतर बोरी परिसरात नाराजीचे वातावरण निर्माण झाले.

या पार्श्वभूमीवर शुक्रवारी बोरी येथील महादेव मंदिरात सर्वपक्षीय व सर्वस्तरीय नागरिकांची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसचे अजय चौधरी, भाजपचे सतीश चौधरी, सरपंच निर्मलाताई चौधरी, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष संतोष चौधरी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत अनेकांनी आपली मते व्यक्त करत बोरीला अप्पर तहसील कार्यालय न मिळाल्याबद्दल संताप व्यक्त केला. अखेर सर्वानुमते १३ जूनपासून बोरी बाजारपेठ व आठवडी बाजार बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयाबाबतचे निवेदन बोरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांना देण्यात आले. निवेदनावर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अजय चौधरी, भाजपचे सतीश चौधरी, सरपंच निर्मलाताई चौधरी, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष संतोष चौधरी, राजाभाऊ गोरे, किशनराव गोरे, डॉ. अरुण चौधरी, संदीप सोमाणी, पंचायत समिती सदस्या लक्ष्मीताई कनकुटे, अश्विनीताई चौधरी यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी, व्यापारी आणि नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### गोदावरी नदीपात्रात बुडून १२ वर्षीय मुलाचा मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी :** पालम तालुक्यातील मौजे फळा परिसरातील गोदावरी नदीपात्रात आंघोळीसाठी गेलेल्या १२ वर्षीय मुलाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी (११ जून) सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली.

साई कैलास पवार (वय १२ वर्षे, रा. रायवाडी, ता. लोहा, जि. नांदेड) हा मुलगा आपल्या कुटुंबासह मौजे फळा येथे देवदर्शनासाठी आला होता. गुरुवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास तो गावातील नदीपात्रात आंघोळ करण्यासाठी उतरला. मात्र त्याला पोहता येत नसल्याने तसेच पाण्याचा खोलीचा अंदाज न आल्याने त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

# मान्सुनच्या पार्श्वभुमीवर परभणीतील रस्ते दुरुस्ती

## चितनरवाडीतील ग्रामस्थांचे तहसीलदारांना उपरोधिक निवेदन

**परभणी ,/प्रतिनिधी:-** जिंतूर तालुक्यातील मौजे चितनरवाडी येथील रस्ता व ओढ्यावरील पूल बांधकामासाठी शासनाकडून दोन वर्षांपूर्वी मंजूर झालेला निधी अद्याप खर्च न झाल्याने गावाच्या रस्ता आणि पूलासाठी उलगुलान आंदोलन करणाऱ्या ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात उपरोधिक पद्धतीने तहसीलदारांना निवेदन सादर केले आहे. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांना पोहण्याचे प्रशिक्षण देण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गेल्या चार वर्षांपासून उलगुलान आंदोलनाद्वारे गावाच्या रस्ता पुल बांधकामासाठी सर्व ग्रामस्थ लोकशाही मार्गाने सातत्याने लढा देत आहेत. पावसाळ्यात गावालगतच्या ओढ्याला पूर येऊन परिसर जलमय होतो. ओढे-नाले दुथडी भरून वाहत असल्याने नागरिक, विद्यार्थी, महिला, शेतकरी व ज्येष्ठ नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो. रस्ता व पूल बांधकामासाठी निधी उपलब्ध असूनही संबंधित यंत्रणेकडून कामे सुरू करण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी



केला आहे.

मागील चार वर्षांपासून विविध शासकीय कार्यालयांकडे पाठपुरावा करूनही प्रश्न सुटलेला नसल्याने ग्रामस्थांनी प्रशासनाला उपरोधिक इशारा दिला आहे. रस्ते व पूल उपलब्ध करून देण्याऐवजी नागरिकांना मोफत पोहण्याचे प्रशिक्षण, लाईफ जॅकेट, दोरखंड व अन्य बचाव साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी स्पष्ट केले की, त्यांची खरी मागणी पोहण्याचे प्रशिक्षण नसून मंजूर निधी तात्काळ खर्च करून रस्ता व पूल बांधकामाची कामे पूर्ण करावीत हीच आहे. अन्यथा पावसाळ्यात घडणाऱ्या कोणत्याही दुर्घटनेस संबंधित विभाग व प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदन विठ्ठल जाधव व समस्त ग्रामस्थ, चितनरवाडी यांच्या वतीने तहसीलदार, जिंतूर यांना सादर करण्यात आले. दोन आठवड्यात उत्तर न दिल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता परभणी यांच्या दालनात जवाब दो आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

## महाडीबीटीच्या मोफत सोयाबीन बियाणे योजनेत बहुतांश शेतकरी वंचित : हजारो अर्जांमधून केवळ ३४५ शेतकऱ्यांची निवड

**सेलू,/प्रतिनिधी-** शासनाच्या वतीने महाडीबीटी पोर्टलद्वारे शेतकऱ्यांना मोफत सोयाबीन बियाणे वाटप करण्यात येत असले तरी सेलू तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी अर्ज करूनही केवळ ३४५ शेतकऱ्यांची निवड झाल्याने उर्वरित शेतकरी या योजनेपासून वंचित राहिल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे मोफत बियाण्यांसाठी अर्ज केलेल्या अनेक शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

तालुक्यात सुमारे ५५ हजारांहून अधिक शेतकरी असून मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून मोफत सोयाबीन बियाण्यांसाठी ऑनलाइन अर्ज दाखल केले होते. कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या वतीने संगणकीय सोडत पद्धतीने लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. मात्र हजारो अर्जांमधून केवळ २२० वैयक्तिक शेतकरी आणि आत्मा अंतर्गत असलेल्या शेतकरी गटांमधील १२५ शेतकरी असे एकूण ३४५ लाभार्थी पात्र ठरले आहेत.

योजनेनुसार एका हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत मोफत सोयाबीन बियाणे देण्यात येतात. साधारणपणे एका एकरासाठी २५ किलो बियाण्यांचे वाटप केले जाते. मात्र मोठ्या संख्येने अर्ज करूनही लाभ मिळाला नसल्याने अनेक शेतकरी संताप व्यक्त करत आहेत. मोफत बियाण्यांच्या आशेने ऑनलाइन अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वेळ आणि खर्च केलेल्या शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. शासनाने केवळ मर्यादित लाभार्थ्यांची निवड केल्याने बहुतांश शेतकरी योजनेपासून दूर राहिल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

याबाबत कृषी विभागाने पात्र लाभार्थ्यांची निवड संगणकीय सोडतीद्वारे पारदर्शक पद्धतीने करण्यात आल्याचे स्पष्ट केले असले, तरी लाभार्थ्यांची संख्या वाढवून अधिकाधिक शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## कॅनॉलच्या सिमेंट भिंतीवर ट्रॅक्टर पलटी; चालकाचा मृत्यू : वाघपिंपरी शिवारातील दुर्घटना

**परभणी,/प्रतिनिधी-** सेलू तालुक्यातील वाघपिंपरी शिवारात कॅनॉलच्या सिमेंट भिंतीवर ट्रॅक्टर पलटी झाल्याने चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना १० जून रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास घडली.

बालाजी विठ्ठलराव जाधव (वय २५, रा. वाघपिंपरी) हे ट्रॅक्टर घेऊन शिराळा येथे शेतीच्या कामासाठी जात होते. त्यावेळी वाघपिंपरी शिवारातील कॅनॉलजवळ ट्रॅक्टरवरील नियंत्रण सुटल्याने वाहन कॅनॉलच्या सिमेंट भिंतीवर आदळून पलटी झाले. या अपघातात ट्रॅक्टरच्या खाली दबून बालाजी जाधव यांचा मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी गोविंद विठ्ठलराव जाधव यांनी सेलू पोलिसांत फिर्याद दिली असून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज यांना 'तपोरत्नम' पुरस्कार जाहीर

**परभणी,/प्रतिनिधी :** अध्यात्म, योग, समाजप्रबोधन आणि मानवकल्याणाच्या क्षेत्रात गेल्या पंचवीस वर्षांपासून निरपेक्ष भावनेने कार्य करणारे सोनपेठ येथील पूज्य श्री नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज यांना प्रतिष्ठेचा 'तपोरत्नम' पुरस्कार जाहीर झाला आहे. काशीचे जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी आणि डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामी यांच्या आदेशानुसार श्री जगद्गुरू विश्वाराध्य जनकल्याण प्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्या वतीने हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे.

दि. १४ जून रोजी सोलापूर येथील वीरतपस्वी मंदिरात जगद्गुरू पंचाचार्य यांच्या उपस्थितीत आयोजित विशेष समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे प्रबंधक राजेंद्रकुमार स्वामी यांनी दिली.

सन २००० मध्ये सोनपेठ मठावर विराजमान झाल्यानंतर श्री नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज यांनी अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. सन २००२ पासून त्यांनी देशातील बारा ज्योतिर्लिंगांमध्ये श्रावणमास अनुष्ठानांची परंपरा सुरू केली. उज्जैन येथील महाकालेश्वर ज्योतिर्लिंगापासून प्रारंभ झालेला हा प्रवास परळी वैद्यनाथ येथे बाराव्या अनुष्ठानाने पूर्ण झाला. त्यानंतर मराठवाड्यातील विविध गावांमध्ये श्रावणमास अनुष्ठानांच्या माध्यमातून अध्यात्मिक जागृतीचे कार्य सुरू आहे.महाराजांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी वैदिक बालसंस्कार शिबिरे, शैक्षणिक साहित्य वाटप, गुणवंत विद्यार्थी सत्कार, आरोग्य शिबिरे, वृक्षारोपण उपक्रम तसेच समाजातील विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय व्यक्तींचा गौरव करण्यात येतो. देशासाठी बलिदान देणाऱ्या शहीद जवानांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करून त्यांनी सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला आहे.

'बेटी बचाव, बेटी पढाव' अभियानांतर्गत १११ मुलींच्या नावे प्रत्येकी ११ हजार रुपयांच्या ठेवी जमा करून त्यांनी स्त्रीशिक्षण आणि महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. तसेच वैदिक परंपरा जतन करण्यासाठी आणि भावी पिढीसाठी पुरोहित तयार करण्याच्या उद्देशाने वैदिक प्रशिक्षण शिबिरांचेही आयोजन केले जाते.

पंचवीस वर्षांच्या कालावधीत अनेक अडचणींवर मात करत त्यांनी सोनपेठ मठाचा सर्वांगीण विकास घडवून आणला असून अध्यात्म, संस्कार आणि समाजसेवेचे प्रभावी केंद्र म्हणून मठाची ओळख निर्माण केली आहे.त्यांच्या या बहुआयामी, लोककल्याणकारी आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेत त्यांना ङ्गतपोरत्नमम पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असल्याने भक्तपरिवार, शिवाचार्य परंपरेतील अनुयायी आणि सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## चारठाणा अप्पर तहसील कार्यालयाला मंजुरी; नागरिकांकडून जल्लोष : पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या पाठपुराव्याला यश

**चारठाणा,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर करण्याच्या मागणीला अखेर यश मिळाले असून गुरुवारी मंजुरीचे पत्र प्राप्त होताच चारठाणा येथे नागरिकांनी फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला. या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर करण्यासाठी काही दिवसांपूर्वी पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुंबई येथे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली होती. या बैठकीत चारठाण्याच्या भौगोलिक, प्रशासकीय आणि ऐतिहासिक महत्त्वाचा सविस्तर आढावा सादर करण्यात आला होता. तसेच नागरिकांना भेडसावणाऱ्या प्रशासकीय अडचणी, विस्तीर्ण महसूल मंडळ क्षेत्र आणि निजामकालीन परगणा म्हणून असलेले चारठाण्याचे ऐतिहासिक अस्तित्व यांचा उल्लेख करून स्वतंत्र अप्पर तहसील कार्यालयाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली होती.

पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी चारठाण्याचे भौगोलिक स्थान, वाढती लोकसंख्या आणि प्रशासनिक सुविधांचा अभाव याकडे महसूलमंत्र्यांचे लक्ष वेधले होते. त्यानंतर महसूलमंत्री बावनकुळे



यांनी या मागणीची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. तसेच या मागणीबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासनही त्यांनी दिले होते.

मंजुरी मिळाल्यानंतर चारठाणा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. अप्पर तहसील कार्यालय सुरू झाल्यानंतर स्थानिकांना तहसील मुख्यालयावर वारंवार जाण्याची गरज कमी होणार असून वेळ आणि खर्चाची बचत होणार आहे. तसेच विविध प्रशासकीय कामे स्थानिक पातळीवर उपलब्ध झाल्याने विकास प्रक्रियेलाही गती मिळणार आहे.

या शिष्टमंडळात भाजपचे नानासाहेब राऊत, पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख, अल्पसंख्याक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मतीन तांबोळी, दीपक भाग्यवंत, संदीप देशमुख, साबेर पठाण आदींचा समावेश होता.

चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर होण्यासाठी पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी विशेष प्रयत्न केले असून त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच हा निर्णय शक्य झाल्याचे मत भाजपचे नेते नानासाहेब राऊत यांनी व्यक्त केले.

## कोचिंग क्लासेससाठी स्वतंत्र कायदा करा : काँग्रेसची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी-** जिल्ह्यातील काही शाळांकडून विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, गणवेश, स्टेशनरी व इतर शैक्षणिक साहित्य विशिष्ट दुकानांतूनच खरेदी करण्याची सक्ती केली जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. तसेच राज्यभरात खाजगी कोचिंग क्लासेसचे वाढते व्यापारीकरण, अवाजवी शुल्क आकारणी आणि विद्यार्थी-पालकांची होणारी आर्थिक पिळवणूक याबाबत कठोर उपाययोजना करण्याची मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

काँग्रेसचे सुहास पंडित, सत्तार इनामदार, आमिर खान पठाण, ज्ञानेश्वर वाघमारे, प्रसाद डुकरे, संजय पारडे, युनूस भाई, रौफ अत्तार, नितीन रनेर, नविद आदी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने शुक्रवार १२ जून रोजी या संदर्भात जिल्हा प्रशासनामार्फत मुख्यमंत्र्यांना एक निवेदन सादर केले. शाळांकडून शैक्षणिक साहित्य खरेदीची सक्ती रोखण्यासाठी तसेच राज्यात स्वतंत्र खाजगी कोचिंग क्लासेस विनियमन कायदा लागू करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. तसेच काही शाळांकडून विशिष्ट दुकानांमधून साहित्य खरेदी करण्यासाठी पालकांवर दबाव टाकला जात असून त्यामुळे पालकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे, राज्यातील अनेक खाजगी कोचिंग क्लासेसकडून अवाढव्य शुल्क आकारले जात असून प्रवेशानंतर फी परत न करण्याच्या अटी, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि निकालांचे अतिरंजित सादरीकरण यामुळे पालक व विद्यार्थ्यांची फसवणूक होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शाळांच्या साहित्य विक्रीची चौकशी, सक्ती करणाऱ्या संस्थांवर कारवाई, कोचिंग क्लासेसची अनिवार्य नोंदणी, शुल्क नियंत्रण यंत्रणा, विद्यार्थ्यांच्या तक्रार निवारणासाठी स्वतंत्र प्राधिकरण, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के मोफत जागा कोचिंग क्लासेसमध्ये तरतूद तसेच राज्यातील प्रमुख कोचिंग संस्थांच्या कार्यपद्धतीची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## १५ वर्षांपासून बंद असलेला 'भांगापूर-मारवाडी' शेतरस्ता अखेर मोकळा : महसूल विभागाच्या मध्यस्थीने वाद मिटला; ३० ते ४० शेतकऱ्यांच्या वहिवाटीचा प्रश्न मार्गी

**सेलू,/प्रतिनिधी :** प्रशासकीय इच्छाशक्ती आणि गावकऱ्यांच्या सामंजस्याच्या बळावर महसूल विभागाने आणखी एक उल्लेखनीय कामगिरी करत भांगापूर शिवारातील गेल्या १५ वर्षांपासून बंद असलेला 'भांगापूर-मारवाडी' शेतरस्ता मोकळा केला आहे. सुमारे दीड किलोमीटर लांबीच्या या रस्त्यावरील अडथळे दूर झाल्याने परिसरातील ३० ते ४० शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या वहिवाटीचा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न सुटला आहे.

भांगापूर शिवारातील हा शेतरस्ता अनेक वर्षांपासून वादग्रस्त ठरला होता. रस्ता बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीपर्यंत पोहोचणे, शेतीमालाची वाहतूक करणे आणि दैनंदिन कृषी कामे करणे मोठ्या अडचणीचे झाले होते. या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महसूल प्रशासनाने पुढाकार घेतला. मंडळ अधिकारी सारिका हेडगे, तलाठी मीना शिंदे, पोलीस पाटील राजेभाऊ कापरे, सरपंच रमेश बोडके तसेच लगतच्या शेतकऱ्यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष घटनास्थळी बैठक घेण्यात आली. तब्बल चार तास सर्व संबंधितांशी सकारात्मक चर्चा करून सामंजस्याच्या माध्यमातून हा रस्ता मोकळा करण्यात आला.

कुपटा मंडळात एकूण १९ गावांचा समावेश असून मंडळ अधिकारी सारिका हेडगे यांनी यापूर्वीही अनेक गुंतागुंतीचे आणि वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले शेतरस्त्यांचे प्रश्न मार्गी लावले आहेत. कुपटा, हट्टा, वलंगवाडी, सोना, केमापूर, राव्हा, कानड, सिमनगाव, गव्हा, बोरगाव जहागीर, पारडी, कौसडी आणि राजुरा आदी गावांमध्ये जवळपास २५ ते ३० शेतरस्ते मोकळे करण्यात त्यांना यश आले आहे. महसूल विभागाच्या प्रभावी मध्यस्थीमुळे अनेक वर्षांपासून रखडलेले आणि शेतकरी वादाचे कारण ठरणारे प्रश्न सुटत असल्याचे दिसून येत आहे. भांगापूर शिवारातील रस्ता खुला झाल्यानंतर शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत महसूल विभागाचे आभार मानले.

महसूल प्रशासनाच्या शेतकरीहिताच्या या कार्याबद्दल मंडळ अधिकारी सारिका हेडगे, तलाठी मीना शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे परिसरातून कौतुक होत असून त्यांच्या कार्यपद्धतीचे नागरिकांनी स्वागत केले आहे..

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## भोंजा हवेली येथे शेतकरी गटांना सोयाबीन बियाण्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ जून -**

महाडीबीटी योजनेअंतर्गत ऑनलाइन पात्र ठरलेल्या शेतकरी गटांना भोंजा हवेली येथे सोयाबीन बियाण्यांचे वाटप करण्यात आले. तालुका कृषी अधिकारी नानासाहेब लांडगे यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडला.



यावेळी गणेश शेतकरी गट व भूमि पुत्र शेतकरी गटातील महिला व पुरुष शेतकऱ्यांना बियाणे वितरित करण्यात आले. तालुका कृषी अधिकारी नानासाहेब लांडगे, मंडळ कृषी अधिकारी एस.के. माळी, उपकृषी अधिकारी बी.एन. हांगे, सहाय्यक कृषी अधिकारी विनोद भाग्यवंत, आत्मा तालुका समन्वयक ए.आर. पाटील आणि कृषी मित्र गणेश नेटके यांनी बियाणे प्रक्रिया, पेरणीपूर्व काळजी व बीबीएफ पद्धतीद्वारे पेरणीबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास उमेद व माविम गटाच्या महिला सदस्यांसह अनेक शेतकरी उपस्थित होते. तसेच प्रकाश कुलकर्णी, सुब्राव मोरे, अमोल नेटके, नंदकुमार मोरे, हनुमंत कोंडलकर यांची उपस्थिती होती.

---

### संक्षिप्त वृत्त...



## बिभिषण रोडगे यांना राष्ट्रीय शिक्षणरत्न पुरस्काराने सन्मानित

**परंडा, दि.१३ जून -**

शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल बिभिषण गणपती रोडगे यांना राष्ट्रीय शिक्षणरत्न पुरस्कार - २०२६ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. एकता सेवाभावी संस्था, महाराष्ट्र यांच्या वतीने मराठी पत्रकार भवन, आझाद मैदान, मुंबई येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात हा सन्मान देण्यात आला. महाराष्ट्राचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार विक्रम काळे, अभिनेते अली खान, ज्येष्ठ अभिनेते व गीतकार सुधाकर शर्मा यांच्या हस्ते रोडगे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेल्या उपक्रमांसह शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देण्यात आला.



## सुरेश टेकाळे यांना पुरस्कार जाहीर

**कळंब, दि.१३ जून -**

संत ज्ञानेश्वर व अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला, कळंब यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश टेकाळे यांना साने गुरुजी कथामालेचा कै. डी. के. कुलकर्णी जिल्हास्तरीय मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर करण्यात आला. संत ज्ञानेश्वर बालकाश्रमाचे संचालक हभप. महादेव महाराज अडसूळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात पुरस्काराची घोषणा करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, ज्येष्ठ नागरिक महासंघाचे तालुका सचिव माधवसिंग राजपूत, साने गुरुजी कथामालेचे जिल्हाध्यक्ष डॉ. गिरीश कुलकर्णी, प्राचार्य महादेव गपाट, सुभाष घोडके, ओबीसी शिक्षक संघटनेचे अशोक शिंपले, प्रदीप यादव, रमेश शिंदे, गौतम जाधवर, डोईफोडे आदी उपस्थित होते.

---

# अणदूरमधील नालीकामाचा प्रश्न ऐरणीवर

**हायवे क्रमांक ६५ लगतच्या नागरिकांची चिंता वाढली... गतवर्षी घरांमध्ये शिरलेल्या पाण्याची पुनरावृत्ती होण्याची भीती...**

### काम तातडीने सुरू करा अन्यथा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१३ जून -**

अणदूर येथून गेलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ लगतच्या नाली बांधकामाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. गतवर्षी नाली नसल्यामुळे पावसाचे पाणी अनेकांच्या घरात शिरून मोठे नुकसान झाले होते. यंदाही अशीच परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने पावसाळ्यापूर्वी तात्काळ नालीचे काम सुरू करावे, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनसे कार्यकर्ते पवन घुगरे यांनी दिला आहे.



याबाबत घुगरे यांनी शुक्रवार (दि. १२) रोजी जिल्हाधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, तहसीलदार तसेच एसटीपीएल कंपनीच्या व्यवस्थापकांना निवेदन सादर केले. निवेदनात म्हटले आहे की, एसटीपीएल कंपनीमार्फत सर्व्हिस रोडलगत नाली बांधण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

गतवर्षी पावसाळ्यात चिवरी पाटी, शिक्षक कॉलनी व परिसरातील अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी घुसले होते. काही घरांमध्ये तर विहिरीप्रमाणे पाण्याचे झरे वाहू लागले होते.

त्यामुळे नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. या संदर्भात अनेकदा लेखी व तोंडी तक्रारी करूनही प्रशासन व कंत्राटदार कंपनीने दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सध्या पावसाळा सुरू झाला असून नाली बांधकाम रखडल्याने पुन्हा मालमत्तेचे नुकसान होण्याची भीती नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे रहिवाशांचे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी तात्काळ नालीचे बांधकाम सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. घुगरे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, १९ जूनपर्यंत कामास सुरुवात न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल.

नागरिकांनीही महामार्ग प्राधिकरणाच्या कारभारावर संताप व्यक्त केला आहे. अपूर्ण सर्व्हिस रोड, निकृष्ट दर्जाचे उड्डाणपूल, अर्धवट नालीकामे आणि वाढते अपघात यामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. टोलवसुली सुरू असताना मूलभूत सुविधा मात्र रखडलेल्या असल्याची टीका होत आहे.

### नाली बांधकामाला अडथळा तरी काय?

नवीन बसस्थानक ते जुने बसस्थानक या नैसर्गिक उताराच्या भागात नाली बांधण्यास कोणतीही तांत्रिक अडचण नसतानाही प्रशासन शांत का आहे, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. दरवर्षी या ठिकाणी पाण्याचा डोह साचत असून त्यामुळे डासांची उत्पत्ती व विविध आजारांचा धोका वाढतो. शिवाय घरांमध्ये पाणी शिरून नागरिकांचे मोठे नुकसान होते. विशेष म्हणजे अणदूर बसस्थानक ते जुने बसस्टँड पुलापर्यंत महामार्ग प्राधिकरणाने अद्याप नालीच बांधलेली नाही. त्यामुळे पावसाचे तसेच सांडपाणी रस्ता मिळेल त्या दिशेने वाहत आहे. महामार्गालगतची पारंपरिक नाली अतिक्रमणामुळे नामशेष झाल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. स्थानिक प्रशासन आणि महामार्ग प्राधिकरण यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे ही समस्या कायम असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

---

## आयटीआयमध्ये १५ जून रोजी अप्रेंटिसशिप भरती मेळावा

**धाराशिव, दि.१३ जून -**

भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिव येथे १५ जून रोजी अप्रेंटिसशिप भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात टाटा मोटर्स, पिंपरी (पुणे) कंपनीकडून विविध ट्रेडमधील उमेदवारांची निवड केली जाणार आहे. मोटार मेकॅनिक, डिझेल मेकॅनिक, फिटर, मशिनिस्ट आदी ट्रेडमधील प्रशिक्षणार्थींना सहभागी होता येणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांना प्रतिमाह १९,८५० रुपये विद्यावेतनासह शासनाकडून ३,५०० रुपये अतिरिक्त प्रोत्साहनपर रक्कम मिळणार आहे.

---

# मान्सूनच्या सरींसोबत ग्रामपंचायत निवडणुकांचे वारे; वाशीत राजकीय हालचालींना वेग

**आरक्षण सोडतीनंतर गावागावांत चर्चा रंगल्या... पराभूत नेत्यांचीही ग्रामपंचायतींकडे नजर...**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१३ जून -**

ग्रामीण सत्तेचे केंद्र मानल्या जाणाऱ्या ग्रामपंचायतींच्या आगामी निवडणुकांची चाहूल लागताच वाशी तालुक्यातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. मान्सूनमुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असला तरी गावपातळीवरील राजकारणाचा पारा मात्र चढलेला दिसत आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्यास अद्याप वेळ असला तरी गावागावांत राजकीय हालचालींना वेग आला आहे.

काही महिन्यांपूर्वी झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये तालुक्यातील काही मातब्बर नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. या पराभवाची भरपाई करत स्थानिक पातळीवरील आपले राजकीय वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी अनेक नेत्यांनी आता ग्रामपंचायत निवडणुकांकडे मोर्चा वळवल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

सरपंच पदाची निवड थेट जनतेमधून होत असल्याने ग्राम पंचायत निवडणुकांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये पराभूत झालेल्या काही नेत्यांकडून यंदाच्या निवडणुकीत थेट किंवा अप्रत्यक्ष सहभाग वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही ठिकाणी हे नेते स्वतः निवडणुकीच्या मैदानात उतरणार की समर्थकांच्या माध्यमातून ताकद दाखविणार, याबाबत गावागावांत चर्चा रंगू लागल्या आहेत.

गेल्या काही दिवसांत झालेल्या आरक्षण सोडतीनंतर राजकीय घडामोडींना आणखी वेग आला आहे.

गावातील चावडी, हॉटेल, चहाचे कट्टे आणि सार्वजनिक ठिकाणी



संभाव्य उमेदवार, वार्डनिहाय समीकरणे आणि पॅनल उभारणीच्या चर्चांना उधाण आले आहे. कोणत्या वार्डातून कोण उमेदवारी करणार, याबाबत तर्क-वितर्क लढविले जात आहेत.

ग्रामपंचायत निवडणुका पक्षचिन्हावर होत नसल्या तरी विविध राजकीय पक्षांचे गट-तट गावागावांत सक्रिय झाल्याचे चित्र आहे. स्थानिक नेते आपल्या समर्थकांची मोट बांधण्यात व्यस्त असून निवडणुकीपूर्वीच मोर्चेबांधणीला सुरुवात झाली आहे. त्यामुळे या निवडणुका अपक्ष स्वरूपाच्या असल्या तरी अनेक राजकीय पक्षांच्या प्रतिष्ठेशी जोडल्या गेल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, प्रभावी कार्यकर्ते, माजी पदाधिकारी, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच गावपातळीवर प्रभाव असलेल्या व्यक्तींना आपल्या पॅनलमध्ये सामावून घेण्यासाठी विविध गटांकडून प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. निवडणुकीतील समीकरणे आपल्या बाजूने वळविण्यासाठी प्रभावी व्यक्तींना आपल्या गोटात खेचण्याच्या हालचालींनाही वेग आला आहे. उमेदवारांची चाचपणी, गटबांधणी आणि संभाव्य आघाड्यांची जुळवाजुळव सध्या सुरू असल्याचे बोलले जात आहे.

अधिकृत निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वीच गावपातळीवरील राजकारण रंगू लागले असून आगामी काळात अनेक गावांमध्ये नव्या आघाड्या, नवी समीकरणे आणि प्रतिष्ठेच्या लढती पाहायला मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे मान्सूनच्या सरींसोबतच ग्रामपंचायत निवडणुकांच्या चर्चाही आता तालुकाभर रंगू लागल्या आहेत.

---

# अस्थी विसर्जनाऐवजी आंब्याचे रोप



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ जून -**

मृत्यूनंतर अस्थी पाण्यात विसर्जित करण्याच्या पारंपरिक प्रथेला पर्यावरणपूरक पर्याय देत परंडा तालुक्यातील जेकटेवाडी येथील तांबे कुटुंबाने समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श ठेवला आहे.

कै. महादेव बळीराम तांबे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या कुटुंबीयांनी अस्थी विसर्जन न करता शेतात पुरून त्यावर केशर जातीच्या आंब्याचे रोप लावले.

या उपक्रमात जेकटेवाडीचे पोलिस पाटील रविंद्र तांबे, माजी सरपंच शहाजी तांबे, शिक्षक दिपक तांबे, धोडींबा तांबे, बापू तांबे, गौतम तांबे, बाळू तांबे, सहदेव तांबे, पांडूरंग तांबे, वाल्मीक तांबे आणि कल्याण तांबे आदी तांबे बंधूंनी सहभाग घेतला. कै. महादेव बळीराम तांबे यांचे बुधवार, १० जून रोजी सायंकाळी निधन झाले होते.

शुक्रवारी १२ जून रोजी अस्थी विसर्जनाचा कार्यक्रम नियोजित होता. मात्र, कुटुंबीयांनी एकमताने निर्णय घेत अस्थी पाण्यात विसर्जित न करता घराजवळील शेतामध्ये पुरल्या.

त्यानंतर त्या ठिकाणी केशर आंब्याचे रोप लावून वडिलांना अनोखी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

---

## प्रस्तावित गेटला नागरिकांचा विरोध

**तुळजापूर, दि.१३ जून -**

तुळजापूर येथील भवानी रोडवरील दीपक चौकात उभारण्यात येणाऱ्या प्रस्तावित गेटला दीपक चौक, जवाहर गल्ली, रावळ गल्ली आणि आर्य चौक परिसरातील रहिवाशांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. याबाबत नागरिकांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन गेट उभारणीचा निर्णय रद्द करण्याची मागणी केली आहे. निवेदनात गेट उभारल्यास नागरिकांची दैनंदिन ये-जा, महिला, वृद्ध व शाळकरी मुलांची गैरसोय होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच वैद्यकीय आणीबाणीच्या प्रसंगी रुग्णवाहिका व अग्निशमन दलाच्या वाहनांना अडथळा निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

---

# वाशी पोलिसांची मोठी कारवाई : चार चोरीच्या मोटारसायकली जप्त; चार गुन्ह्यांची उकल



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१३ जून -**

हायवेवरील लुटमार, जबरी चोरी व दरोड्यासारख्या गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी तसेच रेकॉर्डवरील आरोपींचा शोध घेण्यासाठी वाशी पोलीस ठाण्याकडून राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमेत पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या मोहिमेदरम्यान पोलिसांनी चार चोरीच्या मोटारसायकली हस्तगत करून चार गुन्ह्यांची उकल केली आहे.

वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेवारस अवस्थेत आढळून आलेल्या तीन मोटारसायकलींची तांत्रिक विश्लेषणाद्वारे पडताळणी करण्यात आली. या तपासात दोन मोटारसायकली बीड जिल्ह्यातील नेकनूर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील तर एक मोटारसायकल बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या चोरीच्या प्रकरणातील असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे तीन स्वतंत्र मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले.

याच मोहिमेदरम्यान ८ जून रोजी लोणखस पारधी पिढी येथे रेकॉर्डवरील आरोपींचा शोध घेत असताना सिकंदर साहेबा पवार हा मोटारसायकलवरून संशयास्पदरीत्या पळून जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

पोलीस पथकाने त्याचा पाठलाग केला असता त्याने मोटारसायकल सोडून आडमार्गाने पलायन केले. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या मोटारसायकलच्या चेसिस क्रमांकाची तांत्रिक पडताळणी केली असता ती मोटारसायकल पाटोदा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील असल्याचे स्पष्ट झाले. संबंधित आरोपीचा शोध सुरू असून त्याला अटक करण्यासाठी पोलीस पथके प्रयत्नशील आहेत.

या कारवाईमुळे वाशी पोलिसांनी एकूण चार चोरीच्या मोटारसायकली जप्त करून चार गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळवले असून वाहनचोरी करणाऱ्या टोळ्यांवर प्रभावी कारवाई केल्याचे मानले जात आहे.

---

# ‘सुलभ’ शौचालयाला कुलूप; उमरगा बस स्थानकातील प्रवाशांचे हाल, महिलांची मोठी कुचंबणा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ जून -**

धाराशिव जिल्ह्यातील महत्त्वाचे आणि वर्दळीचे मानले जाणारे उमरगा बसस्थानक येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अखत्यारीतील सुलभ शौचालय अनेक दिवसांपासून बंद असल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. लातूर, सोलापूर, पुणे आणि हैदराबाद या प्रमुख मार्गांवरील शेकडो बसगाड्या दररोज या स्थानकातून ये-जा करतात. मात्र मूलभूत सुविधा असलेले स्वच्छतागृह बंद असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

बसस्थानकाच्या दर्शनी भागात सुलभ शौचालयाचा फलक असून महिलांसाठी, अपंगांसाठी आणि लहान मुला-मुलींसाठी मोफत सुविधा उपलब्ध असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत उभारण्यात आलेल्या या शौचालयाची देखभाल ‘नवयुवक एस.एस. पर्यावरण ग्रामीण विकास संस्था/आस्था’ या संस्थेकडे सोपविण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्षात शौचालयाच्या लोखंडी शटरला कुलूप लावण्यात आले असून कोणताही कर्मचारी तेथे उपस्थित नसल्याचे दिसून येत आहे.



विशेषतः महिला प्रवाशांची मोठी कुचंबणा होत आहे. ग्रामीण भागातील महिला, विद्यार्थिनी आणि नोकरीसाठी प्रवास करणाऱ्या महिलांना बसची प्रतीक्षा करताना स्वच्छतागृहाच्या अभावामुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. रात्री उशिरा किंवा पहाटेच्या वेळेस येणाऱ्या महिला प्रवाशांसाठी ही परिस्थिती अधिकच गंभीर ठरत आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर स्वच्छतेच्या सुविधा बंद राहणे हा आरोग्याचा गंभीर प्रश्न असल्याचेही नागरिकांनी सांगितले. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृह उपलब्ध नसल्याने परिसरात अस्वच्छता वाढण्याची तसेच साथीच्या आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच विविध आजारांनी त्रस्त असलेल्या प्रवाशांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

दररोज हजारो प्रवाशांची वर्दळ असलेल्या बसस्थानकात मूलभूत सुविधा बंद ठेवण्यात आल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. शौचालयाच्या देखभालीसाठी संबंधित संस्थेला शासनाकडून निधी दिला जात असताना सुविधा का बंद ठेवण्यात आली आहे, असा सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

सुलभ शौचालय तात्काळ सुरू करावे, २४ तास स्वच्छ पाणी व वीजपुरवठ्याची व्यवस्था करावी, महिला व दिव्यांगांसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून द्याव्यात तसेच संबंधित ठेकेदार संस्था व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अणदूर येथील एसबीआय एटीएम फोडून चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जून -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील आलुरे शॉपिंग सेंटरमधील स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय)च्या एटीएममध्ये गॅस कटरच्या सहाय्याने मशीन फोडून चोरी झाल्याची घटना ११ जून रोजी पहाटे घडली.

अज्ञात चोरट्याने एटीएमच्या उघड्या दरवाजातून आत प्रवेश करून मशीन गॅस कटरने कापून फोडले. यामध्ये मशीनमधील रोख रक्कम तसेच ह्युजेस कंपनीचे मॉडेम असा एकूण ५३ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला.



याप्रकरणी भिकाजी संभाजी लिमकर (रा. उचगाव, ता. करवीर, जि. कोल्हापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### नेताजी कवठे यांची संचालकपदी बिनविरोध निवड

**उमरगा, १३ जून -**

धाराशिव जिल्हा सहकार बोर्डाच्या संचालकपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार नेताजी निळकंठ कवठे यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश दाजी बिराजदार, जिल्हा युवक अध्यक्ष दिग्विजय शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष भीमा स्वामी, युवानेते रामकृष्ण बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. मुरूम कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक असलेले नेताजी कवठे हे अनेक वर्षांपासून सहकार क्षेत्रात कार्यरत असून विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. त्यांच्या निवडीबद्दल आयोजित सत्कार समारंभाला भाऊसाहेब बिराजदार अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश शहापुरे, संचालक सुभाष गायकवाड, मारुती पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचा सत्कार

**भूम, १३ जून -**


धाराशिव जिल्ह्याचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी भूम-परांडा दौऱ्यादरम्यान भूम येथील श्री चौंडेश्वरी मंदिरास सदिच्छा भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी समस्त कोष्टी समाज बांधव व समाज ट्रस्टच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच दि.२ जून रोजी पांडकर यांनी भूम व परांडा तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी श्री चौंडेश्वरी मंदिरात भेट दिली. त्यावेळी समाजाच्या वतीने त्यांना श्रीकृष्ण मूर्ती, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कोष्टी समाजातील पदाधिकारी, ट्रस्ट सदस्य व समाजबांधव उपस्थित होते.



### एकल महिला शेतकरी सक्षमीकरणासाठी बियाणे वितरण

**कळंब, १३ जून -**

फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशन आणि पर्याय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकल महिला शेतकरी सक्षमीकरण कार्यक्रम व सोयाबीन-तूर मोफत बियाणे वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या उपक्रमात भूम, परंडा, वाशी आणि कळंब तालुक्यातील सुमारे ४०० विधवा व एकल महिला शेतकऱ्यांना सोयाबीन व तूर बियाण्यांचे मोफत वाटप करण्यात आले. तसेच त्यांच्या मुलांना शालेय बॅग व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास अनिताताई तोडकर यांची विशेष उपस्थिती होती. प्रास्ताविक अमोल ठाकरे यांनी केले, सूत्रसंचालन विलास गोडगे यांनी केले तर आभार प्रदर्शन ऋषिकेश तोडकर यांनी मानले.



### डॉ. हरीदास यांची पारगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट

**वाशी, १३ जून -**

वाशी तालुक्यातील पारगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरीदास यांनी भेट देऊन आरोग्य सेवांची गुणवत्ता, रुग्णांना उपलब्ध सुविधा आणि केंद्राच्या एकूण काम काजाचा आढावा घेतला. दि.१२ जून रोजी झालेल्या या पाहणीदरम्यान त्यांनी आरोग्य केंद्रातील विविध विभागांना भेट देत स्वच्छता, औषधसाठा, कर्मचारी उपस्थिती तसेच रुग्णसेवेबाबतची कार्यपद्धती यांची तपासणी केली. केंद्रातील कामकाजाबाबत समाधान व्यक्त करत नागरिकांना अधिक दर्जेदार व प्रभावी आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी आवश्यक सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या भेटीवेळी शिवसेना उपतालुका प्रमुख तथा कृषी उत्पन्न बाजार समिती वाशीचे संचालक विकास तळेकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महिंद्रकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी तसेच आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# ईट प्राथमिक आरोग्य केंद्रातील सौर ऊर्जा प्रकल्पावर प्रश्नचिन्ह





> सध्या माझ्याकडे पाहुणे आले असल्याने मी पुण्यात आहे. या विषयावर मी नंतर बोलतो.
> **आनंद कुलकर्णी**, डिव्हिजनल जनरल मॅनेजर

> या संदर्भात मेठाच्या लातूर कार्यालयास सोमवारी लेखी पत्रव्यवहार करणार आहे. संबंधित कामांची प्रत्यक्ष पाहणी व चौकशी होऊन मेठाकडून सर्व कामे व्यवस्थित झाल्याचे पत्र प्राप्त होत नाही तोपर्यंत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना बिलाच्या देयकाबाबत कळविण्यात येणार नाही.
> **- डॉ. सतीश हरिदास**, जिल्हा आरोग्य अधिकारी

### कामगाराच्या मृत्यूनंतर चौकशीची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१३ जून -**

कुंपणच शेत खात असेल तर न्याय कुणाकडे मागायचा? असा संतप्त सवाल करत ईट येथील नागरिकांनी प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात सुरू असलेल्या सौर ऊर्जा पथदिवे प्रकल्पातील कथित अनियमितता, निकृष्ट दर्जाचे काम आणि सुरक्षा नियमांच्या उल्लंघनाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात सौर ऊर्जा पॅनल उभारण्यासाठी दहा लोखंडी पोल बसविण्याचे काम सुरू असताना २७ मे रोजी भीषण अपघात घडला. काम सुरू असताना एका कामगाराचा जागीच मृत्यू झाला. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, विद्युत वितरण कंपनीची आवश्यक परवानगी न घेता मुख्य विद्युत वाहिनीच्या अगदी खाली काम सुरू करण्यात आले होते. तसेच कामगारांना हेल्मेट, हातमोजे, रबरी बूट यांसारखी मूलभूत सुरक्षा साधनेही उपलब्ध करून देण्यात आली नव्हती. कामादरम्यान उभारण्यात येणारा लोखंडी पोल विद्युत वाहिनीला स्पर्श झाल्याने कामगाराचा मृत्यू झाल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

विशेष म्हणजे एवढी गंभीर घटना घडूनही या प्रकरणाची अधिकृत पोलीस नोंद झालेली नसल्याची चर्चा परिसरात सुरू असून, मृत्यू झाला, पण जबाबदार कोण? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. दरम्यान, उभारण्यात आलेल्या उर्वरित नऊ पोलच्या गुणवत्तेबाबतही गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. पोलच्या बुडाशी आवश्यक त्या प्रमाणात मजबूत काँक्रीट न करता निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. काही ठिकाणी काँक्रीट सहज उखडत असल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे पावसाळा किंवा जोरदार वाऱ्याच्या परिस्थितीत हे पोल कोसळण्याचा धोका असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात दररोज मोठ्या संख्येने रुग्ण, महिला, वृद्ध आणि लहान मुले येत असल्याने संभाव्य दुर्घटनेबाबत नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. तसेच काँक्रीट काम पूर्ण झाल्यानंतर आवश्यक तेवढे पाणी मारण्याची प्रक्रिया न केल्याचाही आरो[प] करण्यात आला आहे.

याशिवाय दोन सौर ऊ[र्जा] पोल मोठ्या झाडांच्या सावली[त] उभारण्यात आल्याचे निदर्शना[स] आले आहे. सौर ऊर्जा प्रकल्पाच[ा] उद्देश सूर्यप्रकाशातून वीज निर्मित[ी] हा असताना सावलीच्या ठिकाणी पॅनल उभारल्यामुळे कामाच्या नियोजनावरही प्रश्नचिन्ह उपस्थि[त] करण्यात येत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काम सुरू असताना संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थिती[त] नऊ पोलचे काम पूर्ण झाल्याचे लेखी पावती गुत्तेदाराला देण्या[त] आल्याची चर्चा आहे. त्यामुळे या प्रकरणात गुत्तेदार, संबंधित अभियंत[ा] आणि जबाबदार अधिकाऱ्यांच[ी] भूमिकाही संशयाच्या भोवऱ्या[त] सापडली आहे.

या सर्व बाबींची सखो[ल] तांत्रिक चौकशी करून कामगाराच्या मृत्यू प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडू[न] करण्यात येत आहे.

## लग्नाच्या आमिषाने २७.५४ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जून -**

> ९ जणांवर गुन्हा दाखल

लग्नाच्या आमिषाने फसवणूक करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास केल्याप्रकरणी तसेच ५० लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केल्याच्या आरोपावरून आनंदनगर पोलीस ठाण्यात नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शिवराज संग्राम पाटील (वय २८, मूळ रा. सुंडगी, ता. देगलूर, जि. नांदेड) यांचे लग्न लावून देण्याच्या बहाण्याने आरोपींनी कट रचला. लग्नानंतर फिर्यादीच्या घरातील सुमारे १७ तोळे सोन्याचे दागिने किंमत २५ लाख ८४ हजार रुपये आणि १ लाख ७० हजार रुपये रोख रक्कम असा एकूण २७ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल अपहार केल्याचा आरोप आहे.

तसेच फिर्यादीची प्रतिमा मलीन करण्याची धमकी देत ५० लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी शिवराज पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून महेश जनार्धन पाटील, नवीनकुमार मारुतीराव पाटील, सुंदरबाई गंगाधर पाटील, शंकर नागोराव खपाटे, शुभांगी उर्फ साक्षी वारले, शिवम खरबुजे, गोरखनाथ वारले, जालिंदरनाथ वारले आणि शुभम वारले यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## पवनचक्की प्रकल्पासाठी मुरूम वाहतुकीचा धुमाकूळ

### महसूल बुडत असल्याची शंका

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१३ जून -**



वाशी तालुक्यात सध्या विविध पवनचक्की प्रकल्पांच्या उभारणीसाठी मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरू असून मुरम वाहतुकीचा धुमाकूळ सुरू असल्याचे चित्र आहे. प्रकल्पासाठी रस्ते बांधकाम, पवनचक्की साहित्य वाहतुकीचे मार्ग आणि इतर पायाभूत सुविधांच्या कामांसाठी हजारो ब्रास मुरमाचा वापर होत असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र या उत्खननातून शासनाला अपेक्षित महसूल मिळत आहे का, याबाबत नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये संशय व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वाशी तालुक्यातील विविध भागांतून मोठ्या प्रमाणात मुरम उत्खनन करून तो कळंब तालुक्याच्या हद्दीत नेला जात आहे. कळंब-वाशी सीमेवरील पांडुरंग हॉटेल परिसरात एका कंपनीकडून मोठ्या प्रमाणात मुरम साठवण्यात आल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. हा मुरम खामकरवाडी व सटवाईवाडी परिसरात उभारण्यात येत असलेल्या पवनचक्की प्रकल्पासाठी वापरला जात असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

दररोज शेकडो ट्रिपद्वारे मुरम वाहतूक होत असताना संबंधित उत्खननासाठी आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या आहेत का, वाहतुकीसाठी शासनाची रॉयल्टी भरली जात आहे का, तसेच शासनाच्या महसुलाचे नुकसान तर होत नाही ना, याची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. दोन्ही तालुक्यांच्या सीमेवर सुरू असलेल्या या हालचालींकडे वाशी व कळंब महसूल प्रशासन दुर्लक्ष करत असल्याची भावन[ा] नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. जर उत्खन[न] आणि मुरम वाहतूक नियमबाह्य पद्धतीने सुर[ू] असल्याचे आढळून आले, तर संबंधित कंपन[ी] व ठेकेदारांवर कठोर कारवाई करून शासनाच्य[ा] महसुलाचे संरक्षण करावे, अशी मागणी शेतकरी व नागरिकांनी केली आहे.

दरम्यान, या प्रकरणाची महसूल प्रशासनाकडून गंभीर दखल घेतली जाणार क[ा] आणि वस्तुस्थिती जनतेसमोर आणली जाणा[र] का, याकडे तालुकावासीयांचे लक्ष लागले आहे.

## रॉयल लॉजवर पोलिसांचा छापा; दोन महिलांची सुटका

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जून -**

शिराढोण पोलीस ठाण्याच्या पथकाने नायगाव शिवारातील रॉयल लॉजवर छापा टाकून सुरू असलेल्या कथित वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश केला. या कारवाईत दोन महिलांची सुटका करण्यात आली असून दोन आरोपींविरुद्ध मानवी अनैतिक व्यवसाय प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक रितू खोखर व अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कोळेकर यांच्या पथकाने ११ जून रोजी गस्तीदरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे कारवाई केली. नायगाव ते मुरुड



मार्गावरील रॉयल लॉजमध्ये महिलांकडून वेश्या व्यवसाय करवून घेत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून खातरजमा केली.

यानंतर सायंकाळी ६.१६ वाजता छापा टाकण्यात आला. कारवाईदरम्यान दोन महिला आढळून आल्या. चौकशीत आरोपी अक्षय दादासाहेब घोगरे व लॉज व्यवस्थापक अजय अच्युत रसाळ यांच्या सांगण्यावरून महिलांना वाणिज्यिक उद्देशाने आश्रय देण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेत त्यांच्या ताब्यातील मोबाईल फोन, नोंदणी रजिस्टर, रोख ५,३०० रुपये व अन्य साहित्य असा एकूण १५,४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच संबंधित महिलांची सुटका करण्यात आली. या प्रकरणी अक्षय दादासाहेब घोगरे व अजय अच्युत रसाळ यांच्याविरुद्ध बीएनएस तसेच मानवी अनैतिक व्यवसाय प्रतिबंधक अधिनियमाच्या विविध कलमांनुसार तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई शिराढोण पोलीस ठाण्याच्या पथकाने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जून -**

लोहारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील तरुणीवर लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणीला संबंधित आरोपीने बसस्थानकातून पैसे देण्याचे सांगून मोटारसायकलवर बसवून नेले. त्यानंतर तिच्याशी बळजबरीने लग्न करून मारहाण केली तसेच जीवे मारण्याच[ी] धमकी देत तिच्यावर लैंगिक अत्याचा[र] केल्याचा आरोप आहे.

तसेच आरोपीने पीडितेच्या घरासमो[र] थांबून जातीवाचक शिवीगाळ केल्याचेह[ी] तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. य[ा] प्रकरणी पीडितेने ११ जून रोजी दिलेल्य[ा] फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध भारतीय न्या[य] संहितेच्या संबंधित कलमांसह अनुसूचि[त] जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आल[ा] आहे. प्रकरणाचा पुढील तपास लोहार[ा] पोलीस करत आहेत.

## पाच लाखांची खंडणी मागितल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जून -**

उसाच्या शेतात जनावरे चारण्यास विरोध केल्याच्या कारणावरून एका ज्येष्ठ शेतकऱ्याकडे पाच लाख रुपयांची खंडणी मागून खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिल्याप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काक्रंबा येथील शेत गट क्रमांक ७८५ मध्ये ८ जून रोजी ही घटना घडली. फिर्यादी मनोहर दासराव काळे (वय ७५, रा. तुळजापूर) यांनी उसात जनावरे चारू नका, असे सांगितल्याने आरोपी आकाश मस्के व सुरेश मस्के (रा. काक्रंबा) यांनी दोन दिवसांत पाच लाख रुपये द्या, अन्यथा जमीन आमच्या नावावर करून द्या, अशी मागणी केली.

तसेच पैसे न दिल्यास तुमच्यावर व तुमच्या मुलावर अॅट्रॉसिटी आणि छेडछाडीचा खोटा गुन्हा दाखल करू, अशी धमकी देत खंडणी मागितल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

## कुंपणच शेत खातंय... | भाविकांकडून अनाधिकृत वसुली

**▶▶ मंदिर सिक्युरिटी गार्डला वसुलीच्या पैशातून कमिशन?... ▶▶ प्रत्येक भाविकाकडून १०० रुपयांची वसुली?...**

### भाविकांची आर्थिक लूट!

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ जून -**

श्री तुळजाभवानी मंदिर महाद्वार येथे महाद्वार प्रवेश बंदीचा गैरवापर करून देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांकडून अनधिकृतपणे वसुली करून सुरक्षा रक्षकांना कमिशन दिले जात आहे. तात्काळ हा गैरप्रकार थांबवून दोषींवर कारवाई करण्याची मागणीसाठी जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थांचे अध्यक्ष यांना निवेदन दिले आहे.

तुळजाभवानी देवीच्या मंदिर विकास कामासाठी ३ जून २०२६ रोजी पहाटे ४ वाजेपासून प्रवेश व्यवस्था बदलली आहे. त्यानुसार सामान्य भाविकांसाठी फक्त बिडकर पायऱ्या मार्ग खुला ठेवला आहे. राजे शहाजी महाद्वार फक्त सिंहासन पूजा, अभिषेक पुजा व ५०० रूपये देणगी पासधारकांसाठी राखीव आहे. परंतु प्रत्यक्षात राजे शहाजी व जिजाऊ महाद्वार येथे काही व्यक्तींकडून प्रत्येक भाविकाकडून १०० रूपये रोख रक्कम घेऊन अनधिकृतपणे आत सोडले जात आहे. संस्थानाने जाहीर केलेल्या ५०० रूपये या अधिकृत दरापेक्षा कमी रक्कम घेऊन पास न देता वसुली होत आहे. स्थानिक नागरिक व तेथील सिक्युरिटी गार्ड यांना या वसुलीतून कमिशन दिले जाते अशी



माहिती मिळाली व त्याचा ३० सेकंदाचा व्हिडिओ आहे. यामुळे संस्थानाच्या आदेशाची पायमल्ली होत आहे. भाविकांची आर्थिक लूट होत असून मंदिराच्या पावित्र्याल[ा] बाधा पोहोचत आहे. राजे शहाज[ी] व जिजाऊ महाद्वार येथे होणार[ी] अनधिकृत वसुली त्वरित थांबवावी केवळ अभिषेकच व ५०० रूप[ये] देणगी पासची पावती देऊन प्रवेश द्यावा. दोषी व्यक्ती व सिक्युरिट[ी] कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करावी व भाविकांना विनासायास दर्श[न] मिळेल अशी व्यवस्था तुळजाभवान[ी] मंदिर प्रशासनाकडे सदरील निवेदनातून पुजारी मंडळांनी विनंत[ी] केली आहे.

निवेदनावर पुजारी मंडळाच[े] अध्यक्ष विपीन शिंदे यांची स्वाक्षर[ी] आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मुरुड अप्पर तहसील निर्मितीला वेग

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जून : मुरुड येथे स्वतंत्र अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्याच्या हालचालींना वेग आला असून महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने यासंदर्भातील प्रक्रिया सुरू करत नागरिकांकडून येत्या पंधरा दिवसांत हरकती मागविल्या आहेत.

शासनाच्या निर्देशानुसार प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालयाबाबत १५ दिवसांची जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात येणार असून या कालावधीत प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांची छाननी केली जाईल. त्यानंतर प्रशासनाचा सविस्तर अहवाल विभागीय आयुक्तांमार्फत शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

मुरुड परिसरातील नागरिकांना महसूल विभागाशी संबंधित विविधा कामांसाठी दूरवर जावे लागते. नवीन अप्पर तहसील कार्यालय सुरू झाल्यास उत्पन्न दाखले, रहिवासी दाखले, जमीनविषयक प्रकरणे तसेच इतर महसूल सेवा स्थानिक स्तरावर उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचणार आहेत.. अप्पर तहसील कार्यालयाच्या स्थापनेमुळे मुरुड परिसराच्या प्रशासकीय विकासाला चालना मिळणार असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. आता शासनाच्या अंतिम निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## विविध वृत्त...

### अनुदान योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १३ जून : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय लातूर यांच्या वतीने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ५० टक्के अनुदान योजनेअंतर्गत ३५, बीजभांडवल योजनेअंतर्गत ३५ आणि थेट कर्ज योजनेअंतर्गत ७० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून, या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील (मांग, मातंग, चांभार व खाटीक वगळून) गरजू लाभार्थ्यांकडून HTTPS://MAHADISHA.MPBCDC.IN या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

यासाठी लाभार्थ्यांची वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे असणे अनिवार्य असून, ऑनलाईन अर्ज करताना जातीचा व उत्पन्नाचा मूळ दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, रेशनकार्डची झेरॉक्स प्रत, आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र, आधार लिंक असलेल्या बँकेच्या पासबुकची झेरॉक्स, टी.सी. व मार्क मेमोसारखी शैक्षणिक कागदपत्रे, व्यवसायाचे कोटेशन, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, उद्यम आधार, शॉप क्ट, संबंधित व्यवसायाचे प्रशिक्षण किंवा अनुभव प्रमाणपत्र आणि दोन पासपोर्ट साईझ फोटो इत्यादी कागदपत्रांची प्रामुख्याने आवश्यकता आहे.

संकेतस्थळावर यशस्वीरित्या ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर, त्या अर्जाच्या दोन प्रती शिवनेरी गेट समोरील जुनी डालडा फॅक्टरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या तळमजल्यावर असलेल्या महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या कार्यालयात प्रत्यक्ष जमा करणे आवश्यक आहे. या योजनेची सविस्तर माहिती पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त गरजू लाभार्थ्यांनी वेळेत ऑनलाईन अर्ज करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महामंडळाचे लातूर जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

### हिंदू खाटीक समाजासाठी कर्ज व अनुदान योजनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १३ जून : हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्यादित (महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित यांची उपकंपनी) लातूर जिल्हा कार्यालयामार्फत सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी विविध कर्ज आणि अनुदान योजना राबविण्यात येणार असून, या योजनांसाठी मुख्यालयाकडून उद्दिष्ट प्राप्त झाले आहे.

या अंतर्गत अनुदान योजनेसाठी ०५, बीजभांडवल योजनेसाठी ०५, थेट कर्ज योजनेसाठी ०६, एनएसएफडीसी टर्म लोनसाठी ०५, एनएसएफडीसी सूक्ष्म पतपुरवठ्यासाठी ०१ आणि एनएसएफडीसी उच्च शैक्षणिक कर्ज योजनेसाठी ०१ असे उद्दिष्ट प्राप्त झाले असून, अनुसूचित जातीतील हिंदू खाटीक समाजातील पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे असणे आवश्यक आहे. अर्जासोबत जातीचा व उत्पन्नाचा मूळ दाखला, रेशनकार्ड, आधारकार्ड, पॅनकार्ड आणि मतदान ओळखपत्राची झेरॉक्स प्रत, रहिवासी प्रमाणपत्र, व्यवसायाचे कोटेशन, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, आधार लिंक असलेल्या बँकेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत, उद्यम आधार, टी.सी. व मार्क मेमोसारखी शैक्षणिक कागदपत्रे, संबंधित व्यवसायाचे प्रशिक्षण व अनुभव प्रमाणपत्र, व्यवसाय परवाना (शॉप क्ट) आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडणे अनिवार्य आहे.

इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळमजला, जुनी डालडा फॅक्टरी, शिवनेरी गेट समोर, लातूर येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा. लातूर जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील हिंदू खाटीक समाजातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या कर्ज आणि अनुदान योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, लातूरचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

## सुजाण भारतीयांनो..!
# कुठे नेऊन ठेवलेय आपल्या 'लोकशाही प्रणाली' ला ?

**तरूण भारत स्पेशल**
**श्रीधर स्वामी**

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १३ जून : आजमितीस भारतीयांच्या दृष्टीने निवडणूक आणि मतदानाची संज्ञा बदलल्याचे दृष्टीपथास येते. लोकशाही प्रणाली संवर्धनाच्या उद्देशाने सार्वत्रिक निवडणूक एक महत्वपूर्ण प्रक्रिया आहे. मात्र, सध्यस्थितीत या प्रक्रियेची जणू क्रूर चेष्टाच चालवली जात आहे. ही चेष्टा सामान्य मतदारांपासून ते विधिमंडळ - संसदेच्या सदस्यांनी मांडल्याचे दुर्दैवाने पाहायला मिळते. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या काही पदाधिकाऱ्यांचाही समावेश होतो. लोकशाही प्रणालीत मतदान सर्वश्रेष्ठ राष्ट्रीय कार्य - कर्तव्य समजले जाते. या कार्यासाठीही ' अपेक्षा ' ठेवल्या जाताना दिसून येतात. त्यामुळेच सुजाण नागरिकांना , कुठे नेऊन ठेवलेय आपल्या ' लोकशाही प्रणाली' ला ? असा उद्विग्न सवाल उपस्थित करण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

निवडणूक, मग ती ग्रामपंचायतीची असो, नगर पंचायत - नगर परिषद - पंचायत समिती - जिल्हा परिषदेची असो की विधान परिषद - राज्यसभा सदस्य निवडण्याची असो, या प्रत्येक निवडणुकीसाठी मतदार असणारी व्यक्ती निवडून येऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून 'काही' ना 'काही' अपेक्षा बाळगून असल्याचे पाहायला मिळते. या अपेक्षा अगदी दारूच्या बाटलीपासून ते काही हजार आणि आताच्या विधान परिषद निवडणुकीसाठी काही ' लाख ' इथपर्यंत असू शकतात. अगदी महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीचा सरपंच व्हायचे म्हटले तरी किमान एखादा कोटीपर्यंत खर्च करणारे उमेदवारही पाहण्यात आले आहेत. सांगण्याचे तात्पर्य काय, तर निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराने मतांसाठी आपल्याला ' लक्ष्मीदर्शन ' घडवले पाहिजे अशा अपेक्षा वाढल्या आहेत. अशा अपेक्षा बाळगताना मतदार चक्क ' त्याला ' काही घरातून द्यायचंय का ? तोही निवडून आल्यास खोऱ्याने पैसे ओढून कमावणाराच आहे ना ? अशा प्रतिक्रिया व्यक्त करताना आढळून येतात. हे पाहून - ऐकून सुजाण नागरिकांच्या मनात काय विचार येत असतील, याचा विचारही करवत नाही.

आपल्याकडे राजकारण म्हणजे कमी वेळेत अमाप पैसा कमावण्याचे माध्यम समजले जाते. याबाबत अनेक उदाहरणे अगदी रास्त पुराव्यासकटही देता येऊ शकतात. मात्र, त्या खोलात जाऊन आपण विषयांतर करणे योग्य नाही. थोडक्यात काय, तर ज्याप्रमाणे सामान्य मतदार कोणत्याही निवडणुकीदरम्यान उमेदवारांकडून ' लक्ष्मी ' दर्शनाची अपेक्षा बाळगून असतात. आता सामान्य मतदारांनी नगर पंचायत - नगर परिषद- महानगरपालिका - पंचायत समिती - जिल्हा परिषदेत निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींची लक्ष्मी द्राक्षणाची पाळी आली आहे. लातूर उस्मानाबाद बीड स्थानी स्वराज्य संस्था विधान परिषदेचे मतदान या आठवड्यात पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी महायुतीकडून माजी राज्यमंत्री बसवराज पाटील मुरूमकर तर महाविकास आघाडीकडून महेश देशमुख निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत. संख्याबळाचा विचार करता महायुतीचे पाटील सहज निवडून येऊ शकतात. तरीही या निवडणुकीसाठीही एका एका मतासाठी ' लाखों' रुपये मोजले जात असल्याची चर्चा सामान्य मतदारांत दबक्या आवाजात होताना ऐकायला मिळत आहे. मागच्या वेळच्या याच मतदार संघातील निवडणुकीपेक्षा यावेळचा दर किमान ' तीन ' लाखांनी वाढल्याचेही बोलले जात आहे. म्हणजे, हा आकडा आता लाखांच्या डबल फिगरमध्ये पोहोचला असावा,असे संबोधण्यास हरकत नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थेत स्वीकृत सदस्य होणे असो, विधान परिषद - राज्यसभेत निवडून जाणे असो, प्रत्येक निवडणुकीसाठी त्या त्या सभागृहाशी संबंधित सदस्यांची मतेही याच मार्गाने मिळवली जात असल्याचे सर्वज्ञात आहे. फक्त यासंदर्भात कोणीही कोणाकडे वाच्यता करत नाही, चर्चा करत नाही म्हणून सारे काही अलबेल सुरु असते. निवडणूक आयोगाचे वरिष्ठ अधिकारीही अनेक बाबी डोळ्यांसमोर घडत असतानाही फारसे काही बोलत नाहीत, हेही आतापर्यंत पाहण्यात आलेच आहे. केवळ लातूरउस्मानाबाद बीड सस्थानिक स्वराज्य मतदार संघातच हा प्रकार चालतोय असे नाही तर राज्यात सगळीकडे त्याची उजळणी - पुनरावृत्ती कमी अधिक प्रमाणात चालू आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. म्हणूनच पोटतिडकीने म्हणावेसे वाटते ' सुजाण भारतीयांनो..! कुठे नेऊन ठेवलेय आपल्या 'लोकशाही प्रणाली' ला ?.

## चोला फायनान्सचा व्यवस्थापक ग्राहकांचे पैसे घेऊन फरार



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जून : शहरात अस्तित्वात असलेल्या चोला फायनान्सच्या व्यवस्थापकाने चक्क ग्राहकांच्या 'इएमआय'चे पैसे घेऊन फरार झाल्याची आणि त्याच्याच कार्यालयामधील कर्मचाऱ्याला ५० हजर रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

चोला मंडल फायनान्सकडून एका ग्राहकाने २० लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. प्रतिकूल परिस्थिती असूनही त्या ग्राहकाने पत्नीचे सोने गहाण ठेऊन ईमान एतबारे चोला फायनान्सचे ६ हप्ते भरले, मात्र त्या पैशांची नोंदच न करता व्यवस्थापकाने ती रक्कम परस्पर पळविली. त्यासोबतच याच फायनान्स कंपनीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला बदली थांबविण्यासाठी चक्क ५० हजरांची लाच मागितली.

हा सर्व प्रकार उघडकीस आल्यानंतर ग्राहक, पिडीत कर्मचारी आणि उदयनराजे भोसले मित्र मंडळच्या कार्यकर्त्यांनी चोला फायनान्सच्या अधिकाऱ्याला घेराव घालत जाब विचारला. यानंतर संबंधित व्यवस्थापकावर तात्काळ कारवाई व रकमेची वसुली करण्याची मागणी करण्यात आली. त्यावर संबंधित प्रशासनाने सकारत्मक प्रतिसाद दिला असून जर कारवाई नाही झाली तर आंदोलनाचा ईशारा यावेळी देण्यात आला आहे.

## लातूरच्या विकासासाठी नगरसेवकांचा महापौरांना घेराव
### विरोधी पक्षनेते देविदास काळे यांचा नेतृत्वात भाजपा आक्रमक



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जून : महानगरपालिकेत सत्तेत येऊन तीन महिन्यांपेक्षा अधिकचा काळ लोटला असला तरी अद्यापपर्यंत सत्ताधारी काँग्रेसकडून शहराच्या विकासाला गती देणारे कोणतेच ठोस निर्णय झालेले नाहीत. विशेष म्हणजे सत्ताधाजयांचा प्रशासनावर अंकुश नसल्यामुळे अधिकाजयांचीही मनमानी वाढलेली आहे. यामुळे शहराचा विकास रखडला असून लातूरची जनता सत्ताधारी आणि प्रशासनाच्या भोवजयात भरडली जात आहे. यामुळेच लातूरच्या विकासाला गती मिळावी याकरिता विरोधी पक्षनेते देविदास काळे यांच्या नेतृत्वात भाजपा नगरसेवकांना आक्रमक भूमिका घेत महापौरांना घेराव घातला होता. शहरातील विकासकामे मार्गी न लागल्यास आगामी काळात अधिक आक्रमक भूमिका घेण्यात येईल, असा इशारा विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी दिला.

महानगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने अनेक आश्र्वासने देत मनपाची सत्ता हस्तगत केली. मात्र, सत्तेत येवून तीन महिन्यापेक्षा अधिकचा काळ लोटला गेला असला तरी अद्यापपर्यंत सत्ताधारी काँग्रेसने विकास कामांबाबत कोणतीही ठोस भूमिका किंवा निर्णय घेतले नाहीत. याउलट सुरु असलेल्या विकासकामांना स्थगिती देत शहराच्या विकासात खोडा घातलेला आहे. सत्ताधाजयांना लातूरचे प्रश्र्न दिसत नसल्याने शहरातील नागरिकांना नागरी सुविधा मिळणेही दुरापास्त होत आहे. जलाशयात मुबलक पाणीसाठा असूनही लातूरकरांना वेळेवर आणि स्वच्छ पाणीपुरवठा होत नाही. शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्याचे नियोजन केवळ कागदावरच होत असून प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही.त्यामुळे शहरात सर्वत्र वाहतूकीचीकोंडी होवून वाहनधारक व नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. मोकाट कुत्र्यांनी एका तरूणाचा बळी घेतला तरी अद्यापर्यंत मोकाट कुत्र्यांसह जनावरांचा बंदोबस्त करण्यात प्रशासन व सत्ताधाजयांना अपयश आले आहे. पावसाळा तोंडावर आलेलाअसतानाही शहरातील रस्त्यांची दुरुस्ती झालेली नसून खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डे अशी अवस्था झालेली आहे. नगरसेवकांकडून खड्डे बुजविण्यासाठी मुरुमाची मागणी होत असून तीही पूर्ण होत नाही.

मनपातील प्रशासक राज जावून लोकनियुक्त सभागृहात अस्तित्वात आले असलेतरी अद्यापपर्यंत अधिकाजयांची मनमानी सुरुच आहे. सत्ताधाजयांचा प्रशासनावर अंकुश नसल्यामुळे अधिकारी त्यांच्या मनात येतील तीच कामे मार्गी लावत नगरसेवकांच्या सूचनांना किंवा मागणींना केराची टोपली दाखवत आहेत. या सर्व बाबींवर सर्वसामान्य लातूरकर भरडला जात असून शहरातील विकास कामेही ठप्प आहेत. त्यामुळेच विरोधी पक्षनेते देविदास काळे यांच्या नेतृत्वात भाजपा नगरसेवकांनी महापौरांना घेराव घालत त्यांना जाब विचारला. लवकरात लवकर विकास कामेमार्गी न लागल्यास यापेक्षाही तिव्र आंदोलन करण्याचा इशारा देविदास काळे यांनी यावेळी दिला. याप्रसंगी भाजपाचे सर्व नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

## आरटीईचे ३२० प्रवेश शिल्लक

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जून : पंचेवीस टक्के आरटीई अंतर्गत आणखी ३२० प्रवेश शिल्लक राहिले असून, गुरूवारी (दि. १२) प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याची शेवटची तारीख होती. गुरूवारी किती पालकांनी प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी केली, यावर पुढे किती प्रवेश झाले, किती शिल्लक राहिले, हे कळणार आहे.

आता पर्यंत आरटीई अंतर्गत २०२३ प्रवेश झाले असून, एकूण २३४३ प्रवेश होणे अपेक्षित आहे. ३२० पालक अजून प्रवेश घ्यायला आलेच नाहीत. बरेच पालक नंबर योग्य इंग्रजी माध्यम शाळेत नाही लागला तर प्रवेश घेण्यात फारसी रूची दाखवत नाहीत. गुरूवारी प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याची संधी पालकांना होती. गुरूवारी ज्या पालकांनी प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी केली असेल त्यांना पुढे तीन दिवसांत प्रवेश घेता येणार आहे, अशी माहिती उपशिक्षणाधिकारी (प्रा.) प्रमोद पवार यांनी दिली.

## लातूर जिल्ह्यात रोजगार व असंघटित उद्योगांच्या सर्वेक्षणाला सुरुवात
### नागरिकांनी खरी माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन




तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १३ जून : राज्यातील जिल्हानिहाय आकडेवारी प्राप्त होण्याच्या दृष्टीने सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय आणि महाराष्ट्र इन्स्टीट्यूशन फॉर ट्रान्सफॉरमेशन (मित्रा) यांच्या सहकार्याने अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत लातूर जिल्ह्यात दोन महत्त्वपूर्ण सर्वेक्षणे राबविण्यात येणार आहेत. नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण (पीएलएफएस) आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण (एएसयुएसइ) अशी या सर्वेक्षणांची नावे असून, ती जून-२०२६ ते डिसेंबर-२०२६ या कालावधीत पूर्ण केली जातील.

या दोन्ही सर्वेक्षणांच्या माध्यमातून जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण आर्थिक आणि सामाजिक आकडेवारी संकलित केली जाणार आहे. पीएलएफएस सर्वेक्षण याअंतर्गत रोजगार, बेरोजगारीचे प्रमाण, महिलांचा कामगारांमधील सहभाग, स्वयंरोजगार आणि असंघटित रोजगार याबाबत अद्ययावत व विश्र्वासार्ह आकडेवारी गोळा केली जाईल.

एएसयुएसइ सर्वेक्षणामधून उत्पादन, व्यापार आणि सेवा या असंघटित क्षेत्रांतील (बांधकाम क्षेत्र वगळून) उद्यम आस्थापनांची माहिती घेतली जाईल. यामध्ये रोजगाराचा प्रकार (पगारी/स्वयंरोजगारी), कार्यरत कामगारांची संख्या, प्रती कामगार व प्रती उद्यम स्थूल मूल्यवृद्धी, उत्पादकता आणि वेतन अशा महत्त्वाच्या आर्थिक निर्देशकांचा समावेश असेल. या संकलित माहितीच्या आधारे राज्य आणि जिल्ह्याच्या उत्पन्नाचा अचूक अंदाज बांधणे आणि जिल्हास्तरीय विकास निर्देशांकांचे मापन करणे प्रशासनाला शक्य होणार आहे.

घरोघरी जाऊन प्रत्यक्ष माहिती गोळा करण्यासाठी अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाने 'इप्सॉस रिसर्च प्रायव्हेट लिमिटेड' या खासगी संस्थेची निवड केली आहे. या संस्थेचे अन्वेषक आणि पर्यवेक्षक निवडक कुटुंबांना, उद्योगांना आणि व्यावसायिकांना प्रत्यक्ष भेट देतील व विहित प्रपत्रात मुलाखतीद्वारे माहिती गोळा करतील. कुटुंबातील प्रमुख व्यक्ती किंवा उद्योग प्रमुखांशी भेट होणे आवश्यक असल्याने, या कर्मचाऱ्यांना रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही काम करण्याची परवानगी प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

या सर्वेक्षणाद्वारे प्राप्त होणाऱ्या माहितीचा दर्जा पूर्णपणे नागरिक आणि व्यावसायिकांनी दिलेल्या सहकार्यावर अवलंबून आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या कुटुंबाची आणि व्यवसायाची अद्ययावत व अचूक माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे. तसेच, कोणतीही शंका किंवा संकोच न बाळगता अन्वेषकांनी विचारलेल्या प्रश्र्नांची खरी माहिती देऊन राष्ट्रीय व जिल्हास्तरीय कार्यात हातभार लावावा, अशी विनंती जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी आणि जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपायुक्त उमाकांत हत्ते यांनी केली आहे.

## नि:पक्ष, भयमुक्त निवडणुकीसाठी आवश्यक उपाय योजना करा : मिलिंद बोरकर



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १३ जून : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. प्रत्येक तहसीलदार कार्यालयामध्ये यासाठी मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली असून या मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच ही निवडणूक नि:पक्ष आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक उपाय योजना करण्याच्या सूचना निवडणूक निरीक्षक मिलिंद बोरकर यांनी दिले. लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आयोजित मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, सूक्ष्म निरीक्षक यांच्या प्रशिक्षणाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, लातूर शहर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश पवार यावेळी उपस्थित होते.

मतदान साहित्य वितरण व स्वीकृती केंद्राचे काम योग्य प्रकारे पार पाडावे. मतपेट्या सुरक्षितपणे मतदान केंद्रावर पोहोचविणे तसेच मतदानानंतर सीलबंद मतपेट्यांची वाहतूक कडक सुरक्षा व्यवस्थेत करावी. या प्रक्रियेत कोणतीही उणीव राहणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी. मतदान केंद्र तहसील कार्यालयात असल्याने मतदारांच्या सोयीसाठी रॅम्प व व्हीलचेअरची व्यवस्था उपलब्ध असावी. निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची खबरदारी घ्यावी. निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे नि:पक्षपाती राहण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे, असेही निवडणूक निरीक्षक बोरकर यांनी सांगितले.

मतदान केंद्रावर नियुक्त सर्व केंद्राध्यक्ष, कर्मचारी यांनी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे. सर्वांनी समन्वयाने काम करून मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडावी, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यावेळी म्हणाले.

प्रारंभी देवणीचे तहसीलदार सोमनाथ वाडकर यांनी उपस्थितांना निवडणूक विषयक प्रशिक्षणाची माहिती दिली.

उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक मिलिंद बोरकर यांनी लातूर तहसीलदार कार्यालय आणि औसा तहसील कार्यालय येथील मतदान केंद्रांना भेट देवून तेथील सुविधांची पाहणी केली. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात तयार करण्यात आलेल्या मतपेटी सुरक्षा कक्षाला भेट देवून तेथील उपाययोजनांचा आढावा घेतला.